सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १७६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ७ ऑगस्ट २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## मोठी किंमत मोजावी लागेल, पण, ट्रम्प यांच्या ५० टक्के टॅरिफवर पंतप्रधान मोदींचं सडेतोड उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नवी दिल्ली**

भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्यामुळे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी (६ ऑगस्ट) भारतावर २५ टक्के अतिरिक्त आयात शुल्क (टॅरिफ) लादत असल्याची घोषणा केली. ट्रम्प यांनी याआधी जाहीर केलेले २५ टक्के शुल्क लागू होण्याच्या १४ तास आधी ट्रम्प यांनी हा नवा आदेश काढला आहे. आधीच्या २५ टक्के आयात शुल्काची अंमलबजावणी आजपासून (७ ऑगस्ट) सुरू झाली आहे, तर अतिरिक्त कराची अंमलबजावणी व्हाइट



हाऊसमधून आदेश निघाल्यापासून २१ दिवसांनी केली जाईल.

दरम्यान, यावर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. मोदी यांनी ट्रम्प यांच्या अरेरावीला संयमी उत्तर दिलं आहे. मोदी म्हणाले, भारत आपल्या शेतकऱ्यांच्या, पशूपालकांच्या, मच्छिमारांच्या हिंतांबाबत कुठल्याही प्रकारची तडजोड करणार नाही. मोदी यांची ही टिप्पणी थेट वॉशिंग्टनसाठी संदेश असल्याचं मानलं जात आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, भारत आपल्या शेतकऱ्यांच्या, पशूपालकांच्या, मच्छिमारांच्या हितांच्या बाबतीत कुठल्याही प्रकारची तडजोड करणार नाही. मला जाणीव आहे की यासाठी मला मोठी किंमत मोजावी लागेल. परंतु, मी त्यासाठी तयार आहे. भारत आपल्या शेतकऱ्यांचा पाठीशी खंबीरपणे उभा आहे. त्यांच्या कल्याणासाठी मी प्रत्येक आव्हानाला तोंड देण्यासाठी तयार आहे. वाढत्या आंतरराष्ट्रीय दबावाला न जुमानता मोदी यांनी ग्रामीण भारताच्या, खेड्यांमधील समुदायांच्या संरक्षणाच्या जबाबदारीबाबतचा सरकारचा निर्धार मोदी यांनी यावेळी अधोरेखित केला.

## महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मोठा घोटाळा
### राहुल गांधी यांनी सादर केले पुरावे, मतदार यादीतील घोळ केला उघड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नवी दिल्ली**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे गेल्या काही दिवसांपासून सातत्याने निवडणूक आयोगाला टीकेचं लक्ष्य करत आहेत. एकीकडे बिहारमधील मतदार यादी पुनरीक्षणाच्या मुद्द्यावरून राहुल गांधी यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. तसेच महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीमध्येही मोठ्या प्रमाणावर घोटाळा झाल्याचा आरोप ते सातत्याने करत होते. दरम्यान, आज राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेत महाराष्ट्रातील मतदानामध्ये झालेल्या घोटाळ्याचे पुरावे सादर केले आहेत.




पत्रकार परिषदेमधून महाराष्ट्रातील मतदानामध्ये झालेल्या घोटाळ्याच्या पुराव्यांचं सादरीकरण करताना राहुल गांधी म्हणाले की, महाराष्ट्रामधील विधानसभा निवडणुकीमध्ये चोरी झाली. महाराष्ट्रामध्ये आम्ही निवडणूक हरलो. महाराष्ट्रामध्ये सुमारे ४० लाख मतदार रहस्यमय आहेत. येथे पाच महिन्यांच्या कालावधीमध्ये अनेक नवे मतदार नोंदवले गेले. या मतदार यादीबाबत निवडणूक आयोगाने उत्तर दिलं पाहिजे. हे मतदार खरे आहेत की खोटे हे निवडणूक आयोगाने सांगितले पाहिजे.

राहुल गांधी म्हणाले की, निवडणूक आयोग आम्हाला इलेक्ट्रॉनिक डेटा का देत नाही. आम्ही निवडणूक आयोगाकडे वारंवार आकडेवारीची मागणी केली आहे. मात्र आम्हाला ती दिली गेली नाही. एवढंच नाही तर निवडणूक आयोगाने आम्हाला उत्तर देण्यास नकार दिला आहे, असा आरोपही राहुल गांधी यांनी केला.ते पुढे म्हणाले की, देशामध्ये बनावट मतदान होत आहे. आम्हाला ही चोरी पकडण्यात बराच काळ लागला. या मतदार यादीमध्ये अनेक लोकांच्या वडिलांच्या नावासमोर काहीही लिहिण्यात आलेलं आहे. मतदारस यादीत अनेक घरांचा पत्ता शून्य आहे. डुप्लिकेट मतदारांची संख्या खूप अधिक आहे. ११ हजार संशयित असे आहेत, ज्यांनी तीन तीन वेळा मतदान केलं आहे. हे लोक कुठून येत आहेत. एकाच पत्त्यावर ४६ मतदार असल्याचं समोर आलं आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या वाढदिवसापासून राज्यात मोठ्या अभियानाला होणार सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान राबविण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसापासून १७ सप्टेंबरपासून या अभियानाची सुरुवात होणार आहे. ९० दिवसांत ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद पातळीवर स्पर्धा घेऊन विजेत्या स्थानिक स्वराज्य संस्थांना सुमारे २९० कोटी रुपयांची बक्षिसे दिली जाणार आहेत.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे या पत्रकार परिषदेत या अभियानाची घोषणा केली. यावेळी प्रधान सचिव एकनाथ डवले उपस्थित होते. प्रशासनाला लोकाभिमुख आणि कार्यक्षम करणे. स्व : निधी, सीएसआर आणि लोकवर्गणीतून आर्थिक स्वावलंबनासह विकास करणे. पाणी व्यवस्थापन, स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणाला बळकटी देणे. शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे.



ग्रामपंचायत पातळीवर शाळा, अंगणवाडी, पशु दवाखाना आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांचे सशक्तीकरण करणे. रोजगार निर्मिती, सामाजिक समता आणि लोकसहभाग व श्रमदानातून विकासाला लोकचळवळीचे स्वरुप देण्याचा अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

या अभियानांतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांना तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावर भरघोष बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे. या सर्व स्तरांवरील बक्षिसांची एकूण रक्कम २९०.३३ कोटी रुपये आहे. राज्यात पहिल्या येणाऱ्या ग्रामपंचायतीला पाच कोटी रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून १७ सप्टेंबर पासून या अभियानाचा प्रारंभ होणार आहे. १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या काळात हे अभियान राबविण्यात येईल. लोकाभिमुख प्रशासन, कर वसुली, पाणी व्यवस्थापन, स्वच्छता, रोजगार निर्मिती, आरोग्य, शिक्षण आणि महिला सक्षमीकरण या निकषांवर १०० गुणांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचे मूल्यमापन केले जाणार आहे.

## नागपूर-पुणे वंदे भारतमध्ये 'स्लीपर 'ऐवजी 'चेअरकार'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नागपूर**

शिक्षण आणि नोकरीसाठी विदर्भातून पुण्याला जाणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. अजनी ते पुणे वंदे भारत एक्स्प्रेस येत्या १० ऑगस्टपासून सुरू होणार आहे. या गाडीचा उद्घाटन सोहोळा नागपूर मध्यवर्ती रेल्वे स्थानकावर सकाळी १० वाजता आयोजित केला जाणार आहे. ही गाडी नागपूरहून सोमवार आणि पुण्याहून मंगळवार वगळता आठवडाभर धावणार आहे.

या गाडीचा १२ तासांचा प्रवास असून 'चेअरकार'ची



सुविधा आहे. आठ तासांपेक्षा अधिक तासांचा प्रवास असल्याने या वंदे भारत एक्सप्रेसला शयनयान (स्लीपर) डबे असतील, असा अंदाज बांधण्यात येत होता. परंतु दिवसभराचा प्रवास असल्याने स्लीपर ऐवजी 'चेअरकार' असलेली वंदे भारत एक्सप्रेस सुरू करण्यात येत आहे.

ही गाडी वर्धा, बडनेरा, अकोला, भुसावळ, जळगाव, मनमाड, दौड, अहिल्यानगर, कोपरगाव थांबणार आहे. या गाडीच्या उदघाटन सोहळ्याच्या तारखेबाबत अद्याप अधिसूचना निघायची आहे. गाडी सुरू होण्याच्या दोन दिवसांपूर्वी ती निघेल, असे मध्य रेल्वेचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक अमन मित्तल यांनी सांगितले.

सध्या नागपूर ते पुणे अंतर कापण्यासाठी दुरान्तोला १२ तास ५५ मिनिटे वेळ लागतो. वंदे भारत एक्स्प्रेसला त्याहून एक तास कमी वेळ लागणार आहे. यासोबत नागपूरमार्गे पुणे-रिवा साप्ताहिक गाडी सुरू झाली आहे. यापूर्वी गरीबरथ एक्स्प्रेस, नागपूर-पुणे एक्स्प्रेस, नागपूरमार्गे गोंदिया-कोल्हापूर एक्स्प्रेस आहे. दरम्यान, रक्षाबंधन आणि स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर नागपूर, पुणे आणि मुंबई दरम्यान विशेष गाड्या सुरू करण्यात येत आहेत. दिवसभर प्रवास पुण्याहून सकाळी ६ वाजून २० मिनिटांनी सुटेल, अजनीला सायंकाळी ६ वाजून २० मिनिटांनी पोहचेल. तर अजनीहून सकाळी ९ वाजून २० मिनिटांनी सुटेल, पुण्याला रात्री ९ वाजून २० मिनिटांनी पोहोचेल.

## राहुल गांधींकडून व्होट चोरीचा आरोप फडणवीसांची त्यांच्यावर जोरदार टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७पणजी**

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत वाढीव मतदान झाल्याचा आरोप विरोधक सातत्याने करत आहेत. याप्रकरणी काँग्रेसचे खासदार आणि लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी हेही वारंवार निवडणूक आयोगावर निशाणा साधताना दिसत आहे. मात्र आता त्यांनी नवी दिल्लीतील इंदिरा भवन मुख्यालयात पत्रकार परिषद घेत निवडणुकीमध्ये घोळ झाल्याचे सांगत पुन्हा एकदा केंद्र सरकार आणि भारतीय निवडणूक आयोगावर निशाणा साधला आहे. याप्रकरणी सत्ताधारी आता राहुल गांधींवर टीका करताना दिसत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही राहुल गांधींवर जोरदार टीका केली आहे.




ओबीसी राष्ट्रीय महाअधिवेशनानिमित्त देवेंद्र फडणवीस आज गोव्यात होते. यावेळी त्यांनी राहुल गांधींनी केलेल्या आरोपसंदर्भात प्रश्न विचारण्यात आला. यावर ते म्हणाले की, मला वाटतं की, राहुल गांधींनी एकदा त्यांचा मेंदू चेक करावा. कदाचित त्यांचा एक मेंदू चोरीला गेला असेल किंवा एका मेंदूमधून चीप चोरीला गेली असेल. त्यामुळे ते वारंवार आरोप करत असतील, असा टोला देवेंद्र फडणवीस यांना लगावला आहे. याचवेळी त्यांना विचारण्यात आले की, उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेण्याचे सुतोवाच केले आहे. या प्रश्नावर देवेंद्र फडणवीस म्हणाले की, त्यांचा निर्णय ते घेतील, मला याबाबत काहीही माहिती नाही.

## माध्यमांशी बोलणे टाळा अन् कामातून उत्तर द्या, एकनाथ शिंदेंची मंत्र्यांना तंबी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नवी दिल्ली**

सध्या प्रत्येक पक्षाने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मोर्चेबांधणी सुरु केली आहे. अशामध्ये महायुतीचा घटकपक्ष असलेल्या शिवसेनेदेखील आपली तयारी सुरु केली असून पक्षाचे प्रमुख आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे गेल्या काही दिवसांपासून दिल्लीत भेटीगाठी घेत आहेत. अशामध्ये महाराष्ट्राच्या राजकारणात मंत्र्यांच्या विधानांची चांगलीच चर्चा झाली. माणिकराव कोकाटे यांच्या वादग्रस्त विधानांमुळे महायुतीला टीकेची झोड सहन करावी लागली. अशामध्ये शिवसेनेचे प्रमुख एकनाथ शिंदे यांनी याच पार्श्वभूमीवर आपल्या मंत्र्यांना महत्त्वाचा सल्ला दिला आहे.



राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांमध्ये बोलणे कमी आणि काम जास्त करण्याचा सल्ला आपल्या मंत्र्यांना दिला आहे. माध्यम किंवा जनसामान्यात केलेल्या वादग्रस्त विधानांमुळे स्वत: मंत्र्याचे आणि पक्षाचे नाव खराब होते. विरोधकांच्या प्रत्येक आरोपाला उत्तर दिलेच पाहिजे असे नाही, त्यांना कामातून उत्तर द्या, अशी तंबीच एकनाथ शिंदे यांनी आपल्या मंत्र्यांना दिली असल्याचे बोलले जात आहे. तसेच, मंत्र्यांना जबाबदारी दिलेल्या जिल्ह्यातून निवडणुकांमध्ये अपेक्षित निकाल दिसला पाहिजे, असेही एकनाथ शिंदे यांनी सांगितले आहे.

## पंकजा मुंडेंना धक्का, राजाभाऊ मुंडे अजित पवारांच्या राष्ट्रवादी मध्ये

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.७बीड**

बीड जिल्ह्यातील राजकारणात मोठी घडामोड घडली आहे. मंत्री यांना अजित पवारांनी मोठा धक्का दिला आहे. यांचे एकेकाळचे विश्वासू असलेले आज अजित पवारांच्या Congress Party मध्ये प्रवेश करणार आहेत. यांच्या निधनानंतर हे यांच्यासोबत सावलीप्रमाणे उभे राहिले होते. या पक्षप्रवेशामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.यांना डावलून आमदार यांच्या नेतृत्वात आणि त्यांच्या पुत्राचा अजित पवारांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर पक्ष प्रवेश होत आहे. यामुळे राजकीय वर्तुळात विरुद्ध असा संघर्ष निर्माण झाला आहे. हा पक्षप्रवेश बीड जिल्ह्याच्या राजकारणावर परिणाम करेल अशी शक्यता वर्तवली जात आहे.

## मुंबई उच्च न्यायालयाने कबुतरांना अन्नपाणी देण्याची बंदी कायम; पर्यायी जागेचा विचार होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

मुंबई उच्च न्यायालयाने कबुतरांना अन्नपाणी देण्याची बंदी कायम ठेवली आहे. तज्ज्ञ समिती गठीत करुन सखोल अभ्यास करा, असे निर्देश उच्च न्यायालयाने महापालिकेला दिले आहेत. नागरिकांच्या आरोग्याची रक्षण करणं महापालिकेचं कर्तव्य आहे. कबुतरांसाठी पर्यायी जागेचा विचार केला जाऊ शकतो, असंही उच्च न्यायालयाने म्हटलं.

मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती कुलकर्णी म्हणाले की, २०१८ चा डॉक्टराचा अहवाल आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, कबुतरांमुळे आजाराचा प्रादुर्भाव होऊ शकतो आणि श्वसनाचे आजार होतात. त्यामुळे कबुतर खाने रहिवाशी स्थानापासून काढले पाहिजेत. याचपार्श्वभूमीवर आम्हाला काही लोकांचा नाही तर सर्व लोकांचा विचार करायचा आहे. कारण सर्व सार्वजनिक जागांवरून नागरिकांची ये-जा होत असते. त्यामुळे आमचे म्हणणे आहे की, या प्रकरणात सरकार आणि महापालिका काय निर्णय घेतात, ते घेऊद्यात. कारणं हा त्यांचा विषय आहे. परंतु त्या जागांवरून हजारे ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुले ये-जा करत असतात. त्यामुळे आम्हाला समतोल राखायला हवा, असे मत न्यायमूर्तींनी मांडले.



न्यायमूर्ती कुलकर्णी म्हणाले की, राज्य शासनाचे कर्तव्य आहे की, तज्ज्ञांचीसमिती तयार करावी आणि त्यात डॉक्टरांचा समावेश असावा. तुम्ही आणि आम्ही यामध्ये तज्ज्ञ नाही, त्यामुळे समितीचा अहवालाचा आपण सर्वांना मान्य करायला हवा. त्यात मुंबईतील सगळ्या महत्त्वाच्या रुग्णालयातील कोणत्या डॉक्टरांचा समावेश करायचा, याचा निर्णय सरकार घेईल, असे न्यायमूर्तींनी स्पष्ट केले. याचवेळी याचिकाकर्त्यांच्या बाजूने भूमिका वकिलाने सकाळी एक तास म्हणजेच ६ ते ७ वाजेपर्यंत आम्हाला कबुतरांना अन्नपानी देण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती केली. यावर न्यायमूर्ती कुलकर्णी म्हणाले की, पुरातन वास्तू विभागाचे विठ्ठल जाधव यांनी आपले स्वतंत्र प्रतिज्ञापत्र न्यायालयाला दिले आहे. कबुतरांना ज्याठिकाणी अन्नपाणी दिले जाते, त्याठिकाणी रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे तज्ज्ञ आणि डॉक्टरांच्या कागदपत्रांच्या आधारे कबुतर खाने बंद करण्याचे आदेश दिले आहेत, असे न्यायमूर्तींनी स्पष्ट केले.



## संपादकीय ......

# अस्मानी संकट!

उत्तराखंडमध्ये झालेल्या ढगफुटीमुळे उत्तरकाशीतील गंगोत्रीच्या मार्गावरील धराली गाव वाहून गेले. चार जणांचा मृत्यू झाला असून, ५० पेक्षा जास्त लोक बेपत्ता आहेत. या राज्यावर गेल्या काही वर्षांत वारंवार संकटे येत असून, दोन वर्षांपूर्वी जोशी मठ तीर्थक्षेत्राची प्रचंड हानी झाली होती. खीरगंगा नदीच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या आताच्या ढगफुटीमुळे अचानक पूर येऊन अनेक घरे वाहून गेली. धराली हा चार धामांपैकी एक असलेल्या गंगोत्रीच्या मार्गावरील एक महत्त्वाचा टप्पा. तेथे अनेक हॉटेल्स, रेस्टॉरंट आणि घरगुती निवासव्यवस्था आहे. पर्यटनावर अवलंबून असलेले हे स्थळ ढगफुटीत पुरते उद्ध्वस्त झाले. या विध्वंसाचे दृश्य भीतीदायक आणि धडकी भरवणारे होते. गंगोत्रीच्या मार्गावर जागोजागी पावसामुळे दगड–माती वाहून आल्याने त्याचे ढिगारे रस्त्यावर साचले. रस्ते मार्ग ठप्प झाले. अनेक भागांत मदत व बचाव पथकेच अडकून पडली. हर्षिल भागात हेलिपॅड वाहून गेले. लष्कराची छावणीही पाण्याखाली गेली. लष्कराचे ८ ते १० जवान बेपत्ता असतानाही अन्य जवान बचावकार्य करण्यास सरसावले आहेत. निसर्गाचे संकट कधी सांगून येत नाही. मंगळवारी दुपारी अनेक लोक घरात विश्रांती घेत असताना ढगफुटीने दगड, पाणी, मातीचे प्रचंड लोट डोंगर दरीतून वेगाने खाली आले. काही कळायच्या आतच इमारती वाहून गेल्या. हे पाणी धरालीच्या दिशेने येत असल्याचे दिसताच दूरच्या ठिकाणी असलेल्या अन्य लोकांना सावध करण्यासाठी स्थानिकांनी इशारे दिले; पण निमिषार्धातच होत्याचे नव्हते झाले. याआधीच्या घटनांचा परामर्ष घेतला असता वारंवार अशा घटना घडल्या आहेत.केदारनाथमध्ये मुसळधार पाऊस आणि पुरामुळे २०१३ मधील दुर्घटनेत मोठी जीवित आणि वित्तहानी झाली. अनेक गावे व वस्त्या, रस्ते, पूल आणि इमारतींची मोठी हानी झाली. यानंतर केदारनाथची यात्रा काही काळ थांबवली होती. केदारनाथ दुर्घटनेतून सावरायला आणि तेथे पुनर्बांधणी व्हायला बराच काळ लागला. या घटनेच्या आठवणी आजही तेथील लोकांच्या मनात जाग्या आहेत. उत्तराखंडमधील हवामान अचानक बिघडल्यामुळे १५ जून रोजी रुद्रप्रयाग जिल्ह्यात हेलिकॉप्टर कोसळून त्यात महाराष्ट्रातील तिघांचा मृत्यू झाला होता. ते केदारनाथ धाम येथून पर्यटकांना गुप्तकाशी तळावर परत आणत होते. मार्चमध्येच चमोली जिल्ह्यामधील बद्रीनाथ धामजवळ हिमकडा कोसळल्यामुळे ५५ कामगार बर्फाच्या ढिगार्याखाली अडकले होते. यातील ५० कामगारांना बाहेर काढण्यात यश मिळाले.

७ फेब्रुवारी २०२१ रोजी ज्योतिर्मठाच्या तपोवन क्षेत्रातील रैमी गावावर ढगफुटी झाल्याने हाहाकार माजला होता. ऋषीगंगा आणि धौलीगंगा नद्यांना पूर आले होते. या आपत्तीत ऋषीगंगा ऊर्जा प्रकल्प आणि तपोवनमधील नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशनचा प्रकल्प उद्ध्वस्त झाला होता. पावणेदोन वर्षांपूर्वी उत्तरकाशीत धरासू ते यमुनोत्रीपर्यंत नवा मार्ग उभारला जात होता. त्यावरील सिलक्यारा–बारकोट मार्गाचा काही भाग कोसळला होता. त्यावेळी बोगद्यात ४१ कामगार अडकले होते. त्यांची सुटका करण्यास १७ दिवस लागले. हा प्रकल्प बद्रीनाथ, केदारनाथ, यमुनोत्री आणि गंगोत्री या पवित्र स्थळांना जोडणार्या चारधाम महामार्ग प्रकल्पाचा एक भाग आहे. या प्रकल्पाचे काम करणार्या कंपनीने आंतरराष्ट्रीय मानकांनुसार काम न केल्यामुळे बोगद्याचा भाग कोसळला. एवढ्या महत्त्वाच्या बोगद्याच्या बांधकामावेळी संकटकालीन मार्ग बनवला नव्हता, हे एक आश्चर्यच होते.

हिमस्खलन ही एक नैसर्गिक आपत्ती आहे. त्यात बर्फ, डोंगर आणि मातीचा मोठा भाग वेगाने खाली घसरतो. अशा घटना बर्फ पडतो त्या डोंगराळ भागात होतात. एकाच भूभागावर भरपूर बर्फ साचतो, तेव्हा पावसाचे पाणी आत झिरपते. त्यातून भूभाग गुळगुळीत होतो आणि हिमस्खलनाला वेग येतो. मुळात हिमालय रांगांमधील प्रदेश भूकंपप्रवण असून, पर्वत भुसभुशीत आहे. तेव्हा रस्ते अथवा बोगदे या स्वरूपाची कामे हाती घेताना निसर्गाच्या समतोलास धक्का लावला जात असतो, हे लक्षात घेतले पाहिजे. हिमालयात डोंगर आडवे–उभे कापले जात आहेत. पर्वतरांगा आतून–बाहेरून पोखरल्या जात आहेत. पर्यटन विकासाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर नागरीकरण सुरू आहे. ते करताना पर्यावरणाचा विचार केला न गेल्याने नैसर्गिक प्रवाहांवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे सुरू आहेत. त्यासाठी बेसुमार वृक्षतोड आणि एकूणच निसर्गाशी खेळ सुरू आहे, हे सारेच धोकादायक आहेच शिवाय मानवी विनाशास आमंत्रणही ठरते आहे. सिंधू नदीच्या उत्तरेस नंगापर्वतापासून अफगाणिस्तानपर्यंत काराकोरम पर्वताची रांग पसरली आहे. काराकोरममधील श्योक नदीचा प्रवाह एका हिमखंडाने रोखला आहे. यामुळे तेथे छोटे छोटे तलाव बनले आहेत.पाण्याचा दबाव वाढला, तर तो हिमखंड तुटेल, असा इशारा शास्त्रज्ञांनी काही वर्षांपूर्वीच दिला होता. उत्तरकाशी हे समुद्रसपाटीपासून ८०० ते ६,९०० मीटर या दरम्यान वसलेले आहे. वर्षभर तेथील मोठा भाग बर्फाच्छादित असतो. या भागात अनेक ठिकाणी हिमनग आहेत. दरवर्षी सरासरी १,२८९ मिलिमीटर पाऊस तेथे पडतो. १९६९ मध्ये तर तेथे २४३६ मि.मी. पाऊस पडला. हवामान बदलामुळे पावसाची तीव्रता वाढली आहे. त्याचा समतोलही बिघडत चालला आहे. हवामानबदलाची चर्चा हा आता केवळ जागतिक परिषदांमधील विषय राहिला नसून, त्याचा प्रत्यक्ष भयावह अनुभवही दिवसेंदिवस येत आहे. देशातील उत्तर व पूर्वेकडील राज्यांत तापमानात विलक्षण वाढ झाली आहेच शिवाय कमाल आणि किमान तापमानातील फरकही वाढतो आहे. तज्ज्ञांचा सल्ला धुडकावून लावून गंगा, भागीरथी, अलकनंदा आदी नद्यांच्या पट्ट्यात जलविद्युत प्रकल्प केंद्रे उभारली. रस्ते मोठे करण्यासाठी डोंगरांमधून बोगदे खणले. यामुळे नैसर्गिक संकटात सर्वजण भरच घालत आहोत. वैज्ञानिकांच्या इशार्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे लोकांच्या जीवांशी खेळणे होय, हे ध्यानात ठेवावे. उत्तरकाशीमधील या ताज्या दुर्घटनेचा हाच अर्थ आहे. हिमालयीन पर्वतरांगांतील विकासाचे दीर्घकालीन नियोजन वेळीच झाले पाहिजे. ते न केल्यास त्याचे काय, याचा हा इशाराही मानता येईल.

# केळी पिकावर फुलकिड्यांचा प्रादुर्भाव, नियंत्रणासाठी ‘हा’ उपाय करा




**दि.७विदर्भ प्रजासत्ताक**

केळी पिकावरील फुलकिड्यांच्या व्यवस्थापनासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. यावर उपाय करणे क्रमप्राप्त ठरते, अन्यथा केळी बागेला पूर्ण प्रादुर्भाव होऊन आर्थिक नुकसान होते. या फुलकिडीच्या नियंत्रणासाठी काय करावे? हे समजून घेऊयात...

**नुकसानीचा प्रकार**

पिल्ले आणि प्रौढ दोघेही फळांचा पृष्ठभाग खरवडतात.

त्यामुळे केळीवर लालसर तपकिरी अंडाकृती डाग पडतात, हे डाग पूर्ण फळावर पसरू शकतात.

जास्त प्रादुर्भावामुळे, साल फुटते आणि उघडे पडलेला भाग त्वरीत खराब होते.

**असे करा व्यवस्थापन**

सर्व आपोआप उगवलेली झाडे आणि जुन्या दुर्लक्षित बागा नष्ट करा.

लागवडीसाठी निरोगी व कीडमुक्त कंदाचा वापर करावा.

घड झाकावे. नुकसानीची खात्री करण्यासाठी फळांची नियमित तपासणी करणे आवश्यक आहे.

घड, खोड व कंद यावर क्लोरपायरीफॉस २० ईसी २.५ मिली/लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

ढालकिडा (लेडीबर्ड बीटल) सारख्या परभक्षी किटकाचा वापर करावा.

– फलोत्पादन पिकावरील किड रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प (हॉटसॅप), किटकशास्त्र विभाग, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




# तुमच्या डोळ्यासमोर कोणी कोसळल्यास काय कराल? जाणून घ्या

**दि.७विदर्भ प्रजासत्ताक**

हल्ली दर काही दिवसांनी तिशी–पस्तिशीतील तरुण–तरुणींचे तडकाफडकी मृत्यू झाल्याच्या बातम्या कानी येताहेत. अलीकडेच पुण्यामध्ये ३७ वर्षीय तरुणाचा जिममध्ये व्यायाम करताना घेतलेल्या ब्रेकदरम्यान हृदयविकाराचा झटका आल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली. फिटनेसबाबत जागरूक असणार्या व्यक्तींबाबत असे जेव्हा घडते तेव्हा संपूर्ण समाजात भीती पसरते.

जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार दरवर्षी सुमारे १७.९ दशलक्ष लोकांचे मृत्यू हृदयविकारामुळे होतात आणि त्यापैकी निम्मे म्हणजेच जवळपास नऊ दशलक्ष मृत्यू अचानक आलेल्या कार्डिॲक अरेस्टमुळे होतात. कार्डिॲक अरेस्ट ही अशी वैद्यकीय आपत्कालीन अवस्था आहे की, जी कोणत्याही क्षणी, अगदी अचानक येऊ शकते आणि त्यात हृदयाचे ठोके थांबतात. त्यामुळे मेंदू, फुफ्फुसे आणि इतर महत्त्वाच्या अवयवांपर्यंत रक्तपुरवठा थांबतो. कार्डिॲक अरेस्ट झाल्यास तत्काळ वैद्यकीय मदत मिळाली नाही, तर तो प्राणघातक ठरतो. आरोग्यसेवा आणि उपचारांमध्ये प्रगती असूनही कार्डिॲक अरेस्ट आजही मृत्यूचे एक प्रमुख कारण आहे. अशा स्थितीत योग्य पद्धतीने आणि त्वरित प्रतिसाद दिल्यास एखाद्याचा जीव वाचू शकतो.

कार्डिॲक अरेस्ट म्हणजे हृदयाचे ठोके अचानक थांबणे. त्यामुळे रक्तप्रवाह थांबतो आणि शरीरातील इतर अवयव विशेषतः मेंदू यांना ऑक्सिजनचा आणि पोषणाचा पुरवठा बंद होतो. ही अवस्था पूर्वसूचना न देता कोणालाही अगदी आरोग्यदायी व्यक्तीलाही होऊ शकते. त्यामुळे याची जाणीव असणे अत्यंत आवश्यक आहे. बरेचदा लोक हृदयविकाराचा झटका म्हणजेच कार्डिॲक अरेस्ट समजतात; पण या दोघांमध्ये फरक आहे. हृदयविकाराचा झटका म्हणजे हृदयाच्या स्नायूंना रक्तपुरवठा करणार्या रक्तवाहिनीत अडथळा निर्माण होणे. त्यामुळे हृदयाच्या विशिष्ट भागाला ऑक्सिजन मिळत नाही आणि तो भाग नष्ट होऊ लागतो. हृदयविकाराचा झटका गंभीर असतो आणि वेळेत उपचार न मिळाल्यास प्राणघातक ठरू शकतो; पण कार्डिॲक अरेस्ट हृदयाच्या विद्युत प्रणालीतील बिघाडामुळे होतो. यावेळी हृदय धडधडणे थांबवते आणि त्यामुळे रक्त पंपिंगची प्रक्रिया पूर्णपणे बंद होते. हृदयविकाराचा झटका कार्डिॲक अरेस्टला कारणीभूत ठरू शकतो; पण या दोन्ही वेगवेगळ्या प्रकारच्या स्थिती आहेत.कार्डिॲक अरेस्ट सहसा कोणतीही पूर्व लक्षणे न देता होतो; पण काही वेळा काही संकेत आधी दिसू शकतात. यामध्ये अचानक बेशुद्ध होणे, हृदयात वेगाने ठोके जाणवणे, चक्कर येणे, डोकं हलकं वाटणे, थकवा, श्वास घेता न येणे किंवा जोरात धाप लागल्यासारखे वाटणे अशी लक्षणे आढळतात. काही लोकांना कार्डिॲक अरेस्ट होण्याआधी छातीत वेदना, मळमळ, उलटी किंवा दम लागण्याची तक्रार जाणवते. ही लक्षणे दिसताच त्याकडे दुर्लक्ष न करता तत्काळ कृती करणे अत्यंत गरजेचे आहे.तुमच्यासमोर कोणी अचानक कोसळले, त्याला श्वास घेता येत नसेल, प्रतिसाद देत नसेल, तर एकही क्षण वाया न घालवता त्वरित कृती करावी लागते. सर्वप्रथम त्या व्यक्तीला जोरात हाक मारून जागं करण्याचा प्रयत्न करा. तो व्यक्ती काही प्रतिसाद देत नसेल, तर तत्काळ आपत्कालीन वैद्यकीय सेवा क्रमांकावर संपर्क साधा. लक्षात ठेवा की, मदतीशिवाय जाणारा प्रत्येक मिनीट रुग्ण बचावण्याची शक्यता सुमारे दहा टक्क्यांनी कमी करतो. आपण कार्डिओपल्मोनरी रिससिटेशन म्हणजेच सीपीआरचे प्रशिक्षण घेतले असेल, तर संपूर्ण प्रक्रिया करा अन्यथा हँडस् ओन्ली सीपीआरही प्रभावी ठरते. रुग्णाच्या छातीच्या मधोमध एक हात ठेवा. त्यावर दुसरा हात ठेवून दोन्ही हातांची बोटे गुंफून छातीवर जोरात आणि जलद दाब द्या. दर मिनिटाला सुमारे शंभर ते एकशेवीस वेळा छातीत किमान दोन इंच खोल दाब देणे गरजेचे आहे. प्रत्येक वेळी दाबल्यानंतर छातीला पूर्ण आराम देणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया आपत्कालीन मदत येईपर्यंत अथवा रुग्णाला श्वासोच्छवास सुरू होईपर्यंत थांबवू नये.



जवळ ऑटोमॅटिक डिफिब्रिलेटर (एईडी) असेल, तर त्याचा वापर त्वरित करावा. हे यंत्र वापरण्यास सोपे असते आणि त्यामध्ये सूचनाही दिलेल्या असतात. सीपीआर सुरू करताना अनेकांना भीती वाटते की, आपण चुकीचे काही करू; पण काहीही न करण्यापेक्षा प्रयत्न करणे अधिक योग्य असते. गरज असल्यास फोनवर आपत्कालीन सेवा आपल्याला सीपीआरसाठी मार्गदर्शन करू शकते.

# महेंद्र कॉलनी ते वायगांव गणपती दर्शन पायदळ वारीत भाविकांची मांदियाळी..

## भजन–पुजन–कीर्तनाच्या मिलापात,श्रीनामाच्या गजरात भाविक तल्लीन..

### श्री.संत गजानन महाराज सेवा समिती भक्त मंडळाचे आयोजन..



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती** – भक्ती, शक्ती व सेवा कार्याबरोबरच आपल्या धार्मिक व अध्यात्मिक आयोजनासाठी ओळखल्या जाणाऱ्या श्री.संत गजानन महाराज सेवा समिती भक्त मंडळ महेंद्र कॉलनी अमरावतीच्या वतीने वायगांव गणपती दर्शन पायदळ वारी काढण्यात आली. या वारीमध्ये शेकडो भाविकांनी सहभागी होऊन श्रीनामाचा गजर केला.

महेंद्र कॉलनी येथील श्री गजानन महाराज प्रतिमा हनुमान मंदिर येथून विधिवत पूजन करून पायदळ वारीला सुरुवात झाली. टाळ–मृदंग वीणा च्या निनादात तसेच भजन पूजन कीर्तनाच्या मिलापात वायगांव गणपती दर्शन पायदळ वारी मार्गस्थ होत असतांना भाविकांनी जागोजागी वारीचे पुजन करून स्वागत केले. दरम्यान नवसारी, चांगपूर फाटा , वलगांव अशा मार्गावरून निघालेल्या पायदळ वारीचा श्री गणपती मंदिर वायगांव येथे समारोप समारोप करण्यात आला. यावेळी भाविकांनी वायगांवच्या गणपतीची विधिवत आराधना करीत सुख–समृद्धी व विश्वमांगल्याची मनोकामना केली. यावेळी भाविकांनी महाप्रसादाचा सुद्धा लाभ घेतला. ईश्वर शक्तीतून भक्तीचा महिमा होऊन सेवाभाव जपणाऱ्या महेंद्र कॉलनी ते वायगांव गणपती दर्शन पायदळ वारीमध्ये

निलेश वडे, भागवत उर्फ बंडु निंभोरकर, शैलेश अमृते, अमोल मंगळे, रोशन भांबुरकर, सचिन कुबडे, सुरज डोके, शुभम निंभोरकर, सुरेंद्र कश्यप, चंदू भाऊ मस्के, पिंटू पोहनकर, शिवा खरड, योगेश खरड, अशोकराव अकोल खेडकर , श्री प्रभू सोळंके, प्रकाश भांबुरकर , संतोष धुळे , रणजीत वसुले, गोपाल माहुलकर, अमोल पारडे आदींसह महिला भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये ध्यान सत्राचे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती–** पी. आर. पोटे पाटील ग्रुप ऑफ एज्युकेशनल इन्स्टिट्यूटच्या पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी येथे नुकताच राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष ध्यान सत्राचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक श्री. ज्ञानेश्वर राव (सीनियर पिरॅमिड मास्टर, हैदराबाद) होते. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनातून उपस्थितांना ध्यानाची शास्त्रीय पद्धत आणि मानसिक आरोग्याबाबत मौल्यवान माहिती मिळाली.या सत्राचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या युनिटमधील स्वयंसेवकांनी, कार्यक्रम अधिकारी डॉ. अमित आर. जयस्वाल व प्रा. प्रगती आर. कातकिडे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पाडले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. दीप्ती बी. रुईकर मॅडम यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# विदर्भ कुंभार समाज सुधार समितीच्यावतीने १२ ऑक्टोबर रोजी विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ

## १५ सप्टेंबर पर्यंत अर्ज सादर करण्याचे समितीचे आवाहन

**विदर्भ पप्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

विदर्भ कुंभार समाज सुधार समितीच्यावतीने १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता बडनेरा रोडवरील संत गोरोबा काका भवन, शशिनगर येथे गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. समारंभात शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, कला आणि क्रीडा क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणा–या व्यक्तींचा विविध पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. याकरिता संबंधितांनी १५ सप्टेंबर पर्यंत आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

इयत्ता १० वी मध्ये किमान ८० टक्के, १२ वी मध्ये किमान ७० टक्के व पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवीमध्ये किमान ७० टक्के गुण प्राप्त करणा–या विद्यार्थ्यांनी अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत सादर करणे आवश्यक आहे.

समाज गौरव पुरस्काराकरिता सामाजिक, राजकीय, कला, शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या व्यक्ती, समाजभूषण पुरस्काराकरिता जिल्हा किंवा राज्य स्तरावर सामाजिक, राजकीय, कला, क्रीडा आणि इतर कौशल्ये प्राप्त केलेल्या व्यक्ती, समाजरत्न पुरस्काराकरिता राज्य किंवा राष्ट्रीय स्तरावर सामाजिक, राजकीय, कला किंवा क्रीडा क्षेत्रात लक्षणीय कामगिरी करणा–या व्यक्तींना समारंभात मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

त्याकरिता अर्ज करणा–या व्यक्तींनी प्रमाणपत्र, इतर पुराव्यांच्या झेरॉक्स प्रती सादर कराव्यात. १ जानेवारी ते १४ सप्टेंबर, २०२५ या काळात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचा–यांनी संपूर्ण बायोडाटासह अर्ज करावा. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख १५ सप्टेंबर ही असून अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती जोडाव्यात.

अर्ज तालुका अध्यक्ष/सचिव किंवा इतर पदाधिका–यांमार्फत त्यांच्या अभिप्रायासह पाठवावा. अधिक माहितीसाठी संस्थेचे सचिव सुरेंद्र सरोदे ९८३४९६८४६०, कोषाध्यक्ष सतिश गावंडे ९४२१७८७८१५, सहसचिव मधुकरराव खांडेकर ९७३००३८६५०, जिल्हाध्यक्ष सुनील भागवत ९७६७१८९४४४, सौ. निर्मला नांदुरकर ९४०३७३८८५०, नंदकिशोर काकडे ९८२२८८४५६४, केशवराव मदनकर ९४२२०२७५१६, राजेंद्र नांदुरकर ७४२१७११४२८ यांच्याशी संपर्क साधावा.

तसेच काही अडचण असल्यास संस्थेचे अध्यक्ष सुधाकरराव शेंडोकार, प्रसिध्दी प्रमुख डॉ. विलास नांदुरकर यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. ७ ऑगस्ट २०२५

शहर/ग्रामिण

# सावधान ! कॅफीनयुक्त शीतपेयांमुळे विद्यार्थ्यांवर गंभीर परिणाम!

## शाळांमध्ये जनजागृती करण्याचे शिक्षण विभागाचे आदेश

### विद्यार्थ्यांच्या शीतपेय सेवनामध्ये प्रचंड वाढ

सुधीर केने

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ अमरावती** –सध्या राज्यातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये कॅफ़ीन युक्त ऊर्जा शीतपेयाचे सेवन झपाट्याने वाढत असल्याचा निष्कर्ष अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य यांच्याकडून निघाला आहे. त्यामुळे जास्त प्रमाणातील कॅफिन व साखरेमुळे विद्यार्थ्यांचे आरोग्यावर गंभीर दुष्परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे .परिणामी याबाबत तात्काळ शाळा महाविद्यालय स्तरावर जनजागृती करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहे.अन्न व औषध प्रशासन




महाराष्ट्र राज्य यांच्याकडून प्राप्त सूचनेनुसार सध्या शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये कॅफ़ीन युक्त ऊर्जा अशीच पेयाचे सेवन वाढत आहे. विशेषता कॅफिनो साखरेमुळे विद्यार्थ्यांचे आरोग्यावर होणाऱ्या गंभीर परिणामामुळे हृदयाचे विकार ,उच्च रक्तदाब, निद्रानाश, मानसिक अस्वस्थता इत्यादी समस्या निर्माण होत असल्याने हे सेवन टाळणे अत्यंत आवश्यक आहे.उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे. म्हणूनच शाळेच्या प्रार्थनेमध्ये, वर्गामध्ये तसेच शिक्षक व पालक बैठकीत कॅफिनयुक्त पेयाचे दुष्परिणाम समजावून सांगण्याचे आदेश देण्यात आले आहे. पोस्टर ,बॅनर तसेच सामाजिक माध्यमे वापरून विद्यार्थ्यांना व पालकांना माहिती देण्याचे आदेश शासनाने दिले आहेत .शाळेच्या परिसरात विक्रीवर बंदी आणण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शाळेच्या परिसरात अशा पेयाची विक्री किंवा जाहिरात होणार नाही याची दक्षता घेणे अनिवार्य आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या स्थानिक अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आवश्यक ते मार्गदर्शन घ्यावे आणि सार्वजनिक आरोग्याची निगडित हि बाब असल्यामुळे याला सर्वोच्च प्राधान्य देऊन तात्काळ शाळांनी कार्यवाही करावी असे आदेश शिक्षण विभागातर्फे देण्यात आले आहेत

#### कायदा काय म्हणतो

अन्नसुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत सर्टिफाईड कार्बोनेटेड आणि नॉन कार्बोनेटेड उत्पादने ही १८ वर्षाखालील लहान मुले, गर्भवती महिला , स्तनदा माता यांच्याकरिता शिफारस केलेली नाही त्यामुळे सद्यस्थितीत या उत्पादनाच्या सेवनावर नियंत्रणाखाली जनजागृती करणे आणि शैक्षणिक परिसरात सदर उत्पादनाची विक्री टाळणे आवश्यक आहे .

## महापालिका निवडणुकीसाठी साडेचार हजार कर्मचाऱ्यांची आवश्यकता

### कर्मचाऱ्यांसाठी सरकारी कार्यालय, शाळांना पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती** – स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसंबंधी सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर आता नवीन प्रभाग रचनेनुसार तसेच ओबीसी आरक्षणासह निवडणुका होणार आहे. स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकरिता निवडणूक विभाग कामाला लागला आहे.



मनपा निवडणुकीसाठी साडेचार ते पाच हजार कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याने महापालिका निवडणूक विभागाने जिल्ह्यातील सरकारी कार्यालय व शाळांना त्यासंबंधी पत्र दिले आहेत. अमरावती मनपाच्या २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीप्रमाणे ८७ जागांसाठी महापालिकेचा हा रणसंग्राम रंगणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत चार आठवड्यात नोटिफिकेशन जारी करा आणि चार महिन्याच्या आत निवडणुका घोषित करा असेआदेश न्यायालयाने दिले होते. १९९४ ते २०२२ पर्यंत जी ओबीसी आरक्षणाची स्थिती होती. त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या, असेही न्यायालयाने सांगितले. न्यायालयाच्या आदेशानुसार आता सर्वोच्च न्यायालयानेसुद्धा ओबीसींना सत्तावीस टक्के आरक्षण राहणार असे म्हणत महापालिकेच्या निवडणुका घ्या, असे आदेश दिले. त्यामुळे आता २०१७ च्या निवडणुकीप्रमाणे ही निवडणूक होणार आहे. २१ फेब्रुवारी २०१७ रोजी महापालिकेचीअखेरची निवडणूक झाली होती. तब्बल आठ वर्षानंतर महापालिकेची निवडणूक होणार असल्याने एकीकडे आजी-माजी व इच्छुक नगरसेवकांमध्ये उत्साह संचारला आहे तर दुसरीकडे प्रशासनही कामाला लागले आहे. २०१७ च्या निवडणुकीवर नजर टाकली असता तेव्हा २२ प्रभाग होते. एका प्रभागात चार नगरसेवक याप्रमाणे २१ प्रभागात चार नगरसेवक प्रभाग क्रमांक ९ एसआरपीएफ वडाळी प्रभागामध्ये तीन नगरसेवक होते. अनुसूचित जातीमध्ये १५, अनुसूचित जमाती दोन व नागरिकांचा मागास प्रवर्ग ओबीसी २३ आणि सर्वसाधारण ४७याप्रमाणे जागा होत्या. सुप्रीम कोर्टाच्या आदेशाने निवडणुकीचा मार्ग तर मोकळा झाला ओबीसीच्या आरक्षणाचा ही प्रश्न मिटला. त्यामुळे आता या निवडणुकीमध्ये महापालिकेत ८७ नगरसेवक पुन्हा निवडून येतील.

तीन वर्षापासून प्रलंबित असलेली महापालिकेची निवडणूक होणार असल्याने प्रशासनसुद्धा कामाला लागले आहे. निवडणूक विभागाने दिलेल्या माहितीनुसार महापालिका क्षेत्रात ८०० ते ९०० मतदान केंद्र राहणार असून मतदान प्रक्रिया व मतदानाने करिता साडेचार ते पाच हजार कर्मचाऱ्यांची आवश्यकता राहणार आहे. एकीकडे प्रशासनाने मतदारयाद्या अद्ययावत करणे, एक जुलैपर्यंतचे अधिकाधिक मतदार मतदान करतील, यासाठी प्रयत्न करणे तसेच यासर्व प्रक्रिया करता कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याने मतदान केंद्रासह त्या कर्मचाऱ्यांची सुद्धा निवड करण्याचे काम सुरू झाले आहे. त्याकरिता निवडणूक विभागाने मनपा क्षेत्रातील सरकारी कार्यालय व शाळांना निवडणुकीकरिता कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याचे पत्र दिले आहे.-

## मेळघाट हाटमध्ये खादी महोत्सवाला सुरवात

### खादीचा वापर वाढविण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ अमरावती,** खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त बसस्थानकासमोरील मेळघाट हाट येथे खादी महोत्सवाचे आज जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

हा महोत्सव १५ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, माविमचे वरीष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी डॉ. रंजन वानखेडे, खादी ग्रामोद्योगचे जिल्हा व्यवस्थापक प्रदिप चेचेरे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी फित कापून खादी महोत्सवाचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी कस्तुरबा सोलर खादी महिला समिती अंतर्गत मेळघाट क्षेत्रातील धारणी तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या महिलांनी कापसापासून सूत आणि सुतापासून कापड ते गारमेंट उत्पादनांची पाहणी केली. या क्लस्टरतर्फे महिलांनी उत्पादीत केलेला माल खादी महोत्सवात विक्री करण्यात येत आहे, या महिलांशी संवाद साधून जिल्हाधिकारी यांनी त्यांचे कौतुक केले. तसेच बचतगट उत्पादीत मालांची पॅकेजिंग आणि ब्रँडिगवर लक्ष देण्याचे आवाहन केले. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी




खादीचा दैनंदिन जीवनातील वापर वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी येत्या काळात खादीला प्रोत्साहन देण्यात येणार असल्याचे सांगितले. नागरिकांनी या महोत्सवाला भेट द्यावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.महोत्सवात विकेंद्रित सोलर चरखा समूहाच्या कार्यक्रमांतर्गत लाभार्थी महिलांनी तयार केलेली दर्जेदार खादी आणि सौर खादी उत्पादने उपलब्ध आहेत. तसेच, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या बचतगटांनी तयार केलेली विविध उत्पादने सवलतीच्या दरात नागरिकांना मिळणार आहेत. खादी महोत्सव दररोज सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. या महोत्सवाला नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळाने केले आहे.

## बडनेरा रेल्वेस्थानकावर अपहरणकर्त्याच्या तावडीतून बालिकेची सुटका

### अपहरणकर्त्याला केले पोलिसांच्या स्वाधीन, वरूडच्या युवकांचे कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ वरुड–** शहरातील दोन धाडसी युवकांनी बडनेरा रेल्वे स्थानकावर अहमदाबाद येथील ३ वर्षीय मुलीचे अपहरण करून नेणाऱ्या आरोपीला पकडून रेल्वे पोलिसांच्या स्वाधिन केले आणि बालिकेलाही सुखरूप तिच्या पालकांच्या सुपूर्द केले. वरूडच्या या दोन्ही धाडसी युवकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.वरुड शहरातील विद्यार्थी परिषदेचे १० युवक अभ्यास वर्गाकरिता नांदगाव खंडेश्वर येथे गेले होते. परतीच्या प्रवासात हे सर्व युवक ३ ऑगस्टच्या सायंकाळी ५ वाजताच्या दरम्यान नांदगाव खंडेश्वर येथून बडनेरा रेल्वे स्थानकावर पोहोचून - प्रतीक्षा कक्षात बसून होते. यावेळी त्यातील - दैविक संजय खंडेलवाल आणी यज्ञेश प्रशांत - यावलकर हे बडनेरा ते वरुड येण्याकरिता तिकीट काढण्याकरिता गेले होते.

याचवेळी अहमदाबाद येथील एक व्यक्ती त्यांच्र्तकडे धाऊन आला व माझ्या ३ वर्षीय चिमुकल्या मुलीचे एक इसम अपहरण करून नेत आहे, तिला वाचविण्यात माझी मदत करा अशी विनवणी करू लागला.दैविक खंडेलवाल व यज्ञेश यावलकर या दोन्ही धाडसी युवकांनी क्षणाचाही विलंब न लावता त्या अज्ञात अपहरणकर्त्याचा पाठलाग करीत त्याला पकडून त्याचेशी दोन हाथ करायला सुरुवात केली.

यावेळी अपहरणकर्ता रेल्वे रुळावरून पळून जात असताना त्याला पकडून त्याच्या तावडीतून चिमुकलीला सोडवून पालकाच्या स्वाधीन केले. तसेच त्या अपहरणकर्त्याला रेल्वे पोलिसांच्या ताब्यात दिले. यावेळी रेल्वे पोलिसांनी दोन्ही युवकांनी जागृत नागरीत होण्याचे कर्तव्य बजावल्याबद्दल त्यांचे कौतुक केले तर मुलीच्या वडीलांनी आभार मानले.

## आदिवासी सुविधा व रस्ते प्रकल्पांवरील ढिसाळ कारभारावर आश्वासन समितीची कडक ताकीद, कामात कसूर करणाऱ्यांवर कारवाई

### पुढील बैठक १०-११ सप्टेंबरला मुंबईत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७मुंबई–** विधान सभेच्या आश्वासन समितीच्या बैठकीत आदिवासी विकास व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रलंबित कामकाजावर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. बैठकीत कामातील ढिसाळपणा, अंमलबजावणीत दिरंगाई आणि आदिवासी भागांमधील सुविधांची दुरवस्था यावर कडक शब्दांत ताशेरे ओढण्यात आले.

अध्यक्ष आमदार रवी राणा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत रस्ता प्रकल्पांतील अनियमितता, बिनापरवाना खोदकाम, सोलार दिव्यांचा अभाव, आदिवासी शाळांची हलाखीची परिस्थिती आणि तांड्यांमधील दळणवळणाच्या अडचणी या मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली.समितीने थर्ड पार्टी ऑडिट करून एका महिन्यात अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले असून, अकस्मात पाहणीही होणार असल्याची घोषणा करण्यात आली. जुन्या आणि



नव्या पुलांच्या स्थितीवरही विशेष लक्ष देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.बिनापरवाना खोदकाम करणाऱ्या यंत्रणांवर कारवाई करत त्यांच्या मशिनरी जप्त करण्याचे निर्देश दिले गेले. तसेच रस्त्यांच्या कडेला सोलार दिवे बसवण्याबाबत अभ्यास अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे.आदिवासी शाळांमधील आहार, स्वच्छता व शिक्षण व्यवस्थापनात सुधारणा, तसेच पारधी समाजातील विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रयत्न करण्यावर भर देण्यात आला आहे. तांड्यांमधील दळणवळणाच्या मार्गांची स्थिती सुधारण्याचेही आदेश दिले गेले.अध्यक्ष रवी राणा यांनी स्पष्ट इशारा दिला की, कामात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर थेट कारवाई करण्यात येईल आणि कोणतीही हलगर्जीपणा सहन केली जाणार नाही.या बैठकीस विविध विभागांचे सचिव, आयुक्त, प्रकल्प अधिकारी, अभियंते, जिल्हाधिकारी व अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रमुख उपस्थितांमध्ये श्रीमती अर्चना वाडेकर, श्रीमती करिश्मा कवडे, प्रमोद पाटील, गजानन वायाळ, रा. शेळके, संजय चिल्लाल, संतोष थिटे, डॉ. शशिकांत साळुंखे, शुभम गुजरे आणि सतीश कोवे यांचा समावेश होता.समितीची पुढील बैठक १० व ११ सप्टेंबर २०२५ रोजी विधानभवन, मुंबई येथे होणार असून, अनियमित प्रकरणांचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे.

## साईनगर स्पर्धा परीक्षा ग्रंथालय व अभ्यासिकेला आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची भेट

### विद्यार्थ्यांशी संवाद, प्रेरणादायी मार्गदर्शन आणि वृक्षारोपणाचा उपक्रम राबवला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती–**अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज साईनगर येथील स्पर्धा परीक्षा ग्रंथालय व अभ्यासिकेला भेट देऊन तेथील विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. या दौऱ्यात त्यांनी अभ्यासिकेतील सुविधा, व्यवस्थापन आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक बाबींचा आढावा घेतला.अभ्यासिकेच्या वतीने आयुक्तांचे स्वागत करण्यात आले. यानंतर त्यांनी अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांशी सविस्तर संवाद साधत स्पर्धा परीक्षेच्या तयारीबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या विविध शंका व अडचणींवर त्यांनी योग्य सूचना देत समर्पक उत्तरे दिली. त्यांच्या या संवादातून विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, सातत्य आणि सकारात्मक दृष्टिकोन यांचे महत्त्व अधोरेखित करत शिक्षण हीच खरी शक्ती आहे हे सांगितले.यावेळी परिसरात वृक्षारोपणाचा उपक्रमही पार पडला. आयुक्तांच्या हस्ते



वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. उपस्थितांनी या उपक्रमाचे भरभरून स्वागत केले.

दौऱ्यादरम्यान आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी संपूर्ण परिसराची पाहणी करून सुधारणा आणि सुविधा वाढविण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. त्यांनी अभ्यासिकेत शांत, सुरक्षित आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण करण्यावर विशेष भर दिला.आयुक्तांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करत सांगितले की, स्पर्धा परीक्षांमधून समाजासाठी काम करण्याची मोठी संधी मिळते. त्यामुळे अभ्यास करताना आत्मविश्वास आणि सकारात्मकता टिकवा. महानगरपालिका प्रशासन विद्यार्थ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे.त्यांनी शहराच्या प्रगतीसाठी केवळ प्रशासन नव्हे तर प्रत्येक नागरिकाचा सक्रीय सहभाग गरजेचा असल्याचे नमूद केले. सार्वजनिक सुविधा जपणे, स्वच्छता राखणे आणि पर्यावरण संरक्षण यामध्ये तरुणांनी पुढाकार घेण्याचे आवाहन त्यांनी केले.या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, महिला व बाल विकास अधिकारी तथा शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, पंकज सपकाळ, अमोल साकुरे, प्रियंका चौहान, श्रीधर हिवराळे, प्रीती बमनोते, अनिकेत भांडे, विशाल इंगोले, महानगरपालिका कर्मचारी, विद्यार्थी, तसेच नागरिक उपस्थित होते.

## नवीन कॉंक्रिटीकरण रत्यावर शेणखताचे ढिगारे

### गजानन देशमुख यांचा न.प. समोर आमरण उपोषणाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.७खल्लार**

नगरपरिषद हद्दीमध्ये अनेक रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्यात आले आहे. परंतु त्यांचा उपयोग खाजगी म्हशी बांधण्याकरिता व शेणखत टाकण्याकरिता होत असल्याचे दिसून येत आहे. अशीच परिस्थिती श्री संत गाडगे महाराज मिशन मुंबई द्वारा संचलित श्री संत गाडगे महाराज बालगृह, बनोसा येथे पहायला मिळत आहे. तेथेही शेणखाताचा ढिग तयार करण्यात आल्याने सर्वत्र घाण व दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. याशिवाय बालाजी मंदिराला जाणारा रस्ता, मेन रोडला येणारा रस्ता यासह अन्य रस्तेही शेणखताच्या विळख्यात सापडलेले आहेत.याबाबत नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे, तर त्वरित कारवाई न केल्यास १४ ऑगस्ट रोजी बालगृहातील मुले नगर परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसतील, असा इशारा बालग्रहाचे गजानन देशमुख यांनी एका जाहीर पत्रकाद्वारे दिला आहे.

# नवसारी परिसरातून १० किलो गांजा जप्त

## युवक पोलिसांच्या ताब्यात,गुन्हे शाखा युनिट १ ची कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती–** दुचाकी वाहनाने गांजाची वाहतूक करणाऱ्या एका ३१ वर्षीय युवकाला स्थानिक नवसारी परिसरातील ऑर्चिड इंटरनॅशनल स्कूलसमोरून बुधवारी (दि.६) दुपारी अटक करण्यात आली. त्याच्या ताब्यातून २ लाख ४६ हजार ६२५ रूपये किमतीचा ९ किलो ९८० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. गुन्हे शाखेच्या युनिट १ ने ही कारवाई केली.

आरीफ बेग हातम बेग (वय ३१, रा. गुलिस्तानगर), असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरीफ बेग हा नवसारी मार्गे गांजा घेऊन जात असल्याची गुप्त माहिती गुन्हे शाखेच्या युनिट १ ला प्राप्त झाली होती. त्यानुसार गुन्हे शाखेचे पथक त्याच्यावर पाळत ठेऊन होते. त्याच्यासाठी नवसारी येथील ऑर्चिड इंटरनॅशनल स्कूल येथे पोलिसानी सापळा रचला होता. बुधवारी दुपारी आरीफ बेग हा दुचाकीने येत होता.त्याच्या पाठीवर स्कूल बॅग होती. नवसारीच्या स्कूलजवळ तो येताच गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याजवळील बॅगमध्ये ९ किलो ९८० ग्रॅम गांजा मिळून आला. गांजा व दुचाकी वाहन जप्त करण्यात आले. तर आरीफ बेग याच्याविरूध्द गुन्हा दाखल करून पुढील कारवाईसाठी त्याला गाडगेनगर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.या कारवाईत गुन्हे शाखा युनिट १ चे पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, सहायक पोलीस निरीक्षक मनिष वाकोडे, इम्रान नाईकवडे, एएसआय अशोक वाटाणे, युसूफ सौदागर, फिरोज खान, सतीश देशमुख, नाझिमोद्दीन सैयद, विकास गुडधे, सचिन भोयर, सूरज चव्हाण, निखिल गेडाम, रंजित गावंडे, रूपेश काळे, नरेश मोहरील, अलिमोद्दीन खतिब, किशोर खेंगर, अशोक खंगर आदी पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

# सहा हॉटेल्सला मिळाले ५ ग्रीन लिफ मानांकन

## अचलपूरचे पाच आणि वलगावमधील एका हॉटेलची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती–**
केंद्र शासनाच्या निर्देशानुसार जिल्ह्याच्या ग्रामीण क्षेत्रातील ओडीएफ प्लस मॉडेल गावाला सुसंगत असे आदरातिथ्य केंद्रसुध्दा असावे, याकरिता ग्रामीण भागातील हॉटेल, लॉज इत्यादींचे मानांकन करण्याबाबत च्या सुचनेवरून जिल्ह्यातील ३४ हॉटेल व्यावसायीकांनी २०० गुणांचे स्वयं मुल्यांकन भरुन दिले. त्यापैकी जीएम लॉन, अग्रवाल भवन, सिद्धिविनायक पॅलेस, त्रिवेणी बार अ‍ॅण्ड रेस्टॉरंट, हॉटेल राजमहल (अचलपूर) तसेच वलगाव येथील सिकची रिसॉर्ट या हॉटेलला फाईव्ह लिफ मानांकन मिळाले आहे.जिल्ह्यात पर्यटन व्यवसायाची भरभराट व्हावी, पर्यटकांना चांगल्या व दर्जेदार सेवा मिळाव्यात सोबत स्वच्छता क्षेत्रात उत्कृष्ट सेवा देणारे हॉटेल, रिसोर्ट, होमस्टे कोणते, याची माहिती पर्यटकांना व्हावी व जास्तीत जास्त पर्यटक असे मानांकन असलेल्या आदरातिथ्य केंद्रास भेटी देतील, असे हे मानांकन देण्यामागचा उद्देश आहे. आदरातिथ्य केंद्र ज्या भागात आहे तो परिसर स्वच्छ व प्रदुषण मुक्त राहील, या करिता उपक्रम राबविण्यात येत आहे.



स्वच्छता ग्रीन लिफ रेटींग बाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे जिल्हास्तरिय समितीची बैठक झाली. यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पापुस्व), जिल्हा परिषद, अमरावती बाळासाहेब रायबोले यांनी समितीला माहिती देताना सांगीतले की, जिल्हयातून ३४ हॉटेल व्यावसायीकांनी २०० गुणांचे स्वयंमुल्यांकन भरुन दिले. त्यानंतर त्यांना सुधारणा करण्यासाठी दोन महिण्याचा अवधी देण्यात आला व त्यानंतर तालुका दंडाधिकारी (डऊज) यांच्या समितीने ३४ पैकी ३२ हॉटेलसूची पडताळणी करुन गुणदान केले. त्यांची पडताळणी तालुका दंडाधिकारी (डऊज) यांचे समितीने केली असून सदर समितीने ६ हॉटेलला २०० पैकी १८० ते २०० गुण दिल्याने जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरिय समितीने संबंधीत हॉटेलला ५ ग्रीन लिफ हे मानांकन देण्यास मान्यता प्रदान केली आहे. जिल्हाधिकारी यांनी फक्त ५ ग्रीन लिफ मानांकन मिळवणाऱ्या हॉटेललाच तुर्तास मान्यता प्रदान करुन ज्यांना १ व ३ मानांकन आहे, त्यांना सुधारणा करण्यास सांगून त्यांना सुध्दा ५ ग्रीन लिफ मानांकन मिळेल, असे प्रयत्न करावे. ज्या २१ हॉटेलला अत्यंत कमी गुण मिळाले त्यांनीसुध्दा सुधारणा करावी व त्यांचे पुन्हा मुल्यांकन करावे, असे निर्देश यावेळी देण्यात आले. बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी, संजिता महापात्र, उप मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस, पर्यटन विभागाचे अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी उपस्थित होते.

# कुख्यात हातभट्टीचालक एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती,**अमरावती ग्रामीण पोलिसांनी पाळा, ता. मोर्शी येथील कुख्यात हातभट्टीचालक शेरु शहा करीम शहा याला महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमानुसार एमपीडीए कायद्याखाली एक वर्षासाठी स्थानबद्ध केले आहे.शेरु शहा करीम शहा हा अनेक वर्षांपासून पाळा आणि परिसरात गावठी हातभट्टीची दारू विकण्याचे अवैध धंदे चालवत होता. त्याच्या या व्यवसायामुळे परिसरातील तरुण मुले व्यसनाधीन झाली होती, ज्यामुळे भांडण-तंटे आणि महिलांची छेडछाड यांसारखे प्रकार वाढले होते. त्याच्यावर अनेकदा कारवाई करूनही त्याने अवैध व्यवसाय सुरूच ठेवला होता. त्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी त्याला स्थानबद्ध करण्याचा प्रस्ताव जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडे सादर केला. जिल्हादंडाधिकारी आशिष येरेकर यांनी सर्व कायदेशीर बाबी तपासल्यानंतर शेरु शहा करीम शहा याला एक वर्षासाठी अमरावती जिल्हा मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्याचा आदेश ३० जुलै २०२५ रोजी दिला. या आदेशानुसार त्याला त्याच दिवशी जिल्हा मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे.सदर कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद आणि अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे, सहायक पोलिस निरीक्षक सारंग बोंम्पीलवार, पोलिस उपनिरीक्षक विष्णुपंत राठोड, पोहेकॉ अमोल देशमुख आणि पोलिस स्टेशन मोर्शीचे ठाणेदार पोलिस निरीक्षक सुरज बोंडे, नितीन देशमुख, पोहेकॉ योगेश सांभारे यांनी पार पाडली.अमरावती ग्रामीण जिल्ह्यामध्ये शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी गंभीर गुन्हे करणाऱ्या गुंडांवर एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाई सुरूच राहील, असे पोलिसांनी सांगितले आहे.

# शिराळा येथील चक्री जुगारावर गुन्हे शाखेची कारवाई

## तीन जण ताब्यात, मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७वलगाव –** वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिराळा येथे सुरू असलेल्या ऑनलाईन चक्री जुगारावर गुन्हे शाखेच्या युनिट १ च्या पथकाने धाड घालून १४ हजार ५५० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. येथून तीन जणांना ताब्यात घेण्यात आले.



संजय अंबादास नागे (वय ५५), अशोक नारायणराव खाडे (वय ६५), रियाज अहमद अब्दुल बशिर (वय ४५) सर्व रा. शिराळा या तिघांना पोलिसानी ताब्यात घेतले. तर दिनेश झाडे रा. यवतमाळ हा पसार आहे. त्यांच्या ताब्यातून एलईडी टिव्ही व इतर साहित्य जप्त करण्यात आले. शिराळा येथे ऑनलाईन चक्री जुगार खेळला जातअसल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट १ ला प्राप्त झाली होती. त्यानुसार या पथकाने शिराळा गाव गाठले. तेथील लालाजी पान सेंटरच्या दुकानात ऑनलाईन चक्री जुगार खेळला जात होता. पोलिसांनी याप्रकरणी तीन जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून जुगार साहित्य जप्त केले.या कारवाईत गुन्हे शाखा युनिट १ चे पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, सहायक पोलीस निरीक्षक मनिष वाकोडे, इम्रान नाईकवडे, एएसआय अशोक वाटाणे, युसूफ सौदागर, फिरोज खान, सतीश देशमुख, नाझिमोद्दीन सैयद, विकास गुडधे, सचिन भोयर, सूरज चव्हाण, निखिल गेडाम, रंजित गावंडे, रूपेश काळे, नरेश मोहरील, अलिमोद्दीन खतिब, किशोर खेंगर, अशोक खंगर आदी पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश होता

# दानशूर रविभाऊ काकडे यांनी सेवानिवृत्ती उपदानातून श्री संत गोरोबा काका भवनासाठी दिले १लाख रु.चे योगदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती: –** विदर्भ कुंभार समाज सुधार समिती, अमरावती यांच्यावतीने सुरू असलेल्या श्री संत गोरोबा काका भवनाचे बांधकाम सध्या अंतिम टप्प्यात आहे.

निधीच्या कमतरतेमुळे बांधकामाचा वेग मंदावला असताना, श्री रविभाऊ काकडे यांनी मदतीचा हात पुढे केला आहे. त्यांनी त्यांच्या सेवानिवृत्ती उपदानातून एक लाख रुपयांची देणगी संस्थेस देऊन बांधकामाला पुन्हा गती दिली. त्यांच्या या योगदानाबद्दल संपूर्ण कुंभार समाजातर्फे त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे.

श्री रविभाऊ काकडे यांनी अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत नोकरी केली आणि ३१ मे २०२५ रोजी ते सेवानिवृत्त झाले.

नुकतीच त्यांना सेवानिवृत्ती उपदानाची रक्कम मिळाली. शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे त्यांना कुटुंब निवृत्ती वेतन नसून, ही रक्कम त्यांच्या जीवनातील शेवटची आर्थिक बचत आहे. या रकमेतूनच त्यांना पुढील आयुष्याचे आर्थिक नियोजन करायचे आहे. अशा परिस्थितीतही, त्यांनी समाजासाठी एक लाख रुपयांची देणगी देऊन सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले आहे.

कुटुंब निवृत्ती वेतन नसतानाही केलेल्या या देणगीमुळे त्यांचे दातृत्व आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडते. अशा निस्पृह आणि दानशूर व्यक्तींमुळे काकडे कुटुंबाचे कुंभार समाजात आदराचे स्थान आहे.

'स्वतःचा विचार नंतर, आधी समाज' या भावनेने प्रेरित होऊन काम करणाऱ्या रविभाऊंसारख्या व्यक्ती समाजात दुर्मिळ आहेत, परंतु त्यांच्यासारख्या व्यक्तींमुळेच इतरांना प्रेरणा मिळून समाजाचे काम पूर्णत्वास जात आहे.

या निधीचा धनादेश त्यांनी संस्थेचे अध्यक्ष श्री सुधाकर शेंडोकार यांच्याकडे सुपूर्द केला. या प्रसंगी संस्थेचे सचिव श्री सुरेन्द्र सरोदे, कोषाध्यक्ष श्री सतीश गावंडे, श्री रमेशराव तांबट, श्री राजेंद्र नांदुरकर, तसेच काकडे कुटुंबातील सौ. सुषमाताई काकडे, त्यांचे चिरंजीव श्री सारंग, सून सौ. नेहा, बंधू श्री अविनाशराव काकडे आणि सौ. सारिकाताई काकडे, सौ. मालतीताई गावंडे, सौ. प्रतिभा शै. गावंडे, चि. अनुराग आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या वतीने श्री रविभाऊ यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

# जिल्हा परिषदेत पाणी पुरवठ्यासाठी नवीन चार दुरुस्ती वाहनांची खरेदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती,**
६जिल्ह्यातील ग्रामीण जनतेला शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

सध्या कार्यरत असलेल्या ६ हजार २५ हातपंपांच्या नियमित देखभाल व दुरुस्तीसाठी आता चार नवीन दुरुस्ती वाहने खरेदी करण्यात आली आहेत. यामुळे, हातपंपांची देखभाल व दुरुस्ती अधिक जलद आणि सोयीस्कर होणार आहे.



पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सन २०२३-२४ च्या सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेतून पथकांच्या खरेदीसाठी रुपये ४९.९६ लाख इतका निधी उपलब्ध करून दिला. या निधीतून सन २०२५-२६ या वर्षात ही चार नवीन दुरुस्ती पथके खरेदी करण्यात आली आहेत. यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुदर्शन तुपे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी हेमंत ठाकरे, तसेच ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुनिल जाधव आणि उप अभियंता प्रमोद कराळे यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

# नारायणदास लद्धा हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**
निमा अमरावती शाखेच्या सौजन्याने दिनांक १ ऑगस्ट व २ ऑगस्ट २०२५ रोजी दोन दिवस नारायणदास लद्धा हायस्कूल, अमरावती येथे शालेय आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात इयत्ता पाचवी ते दहावीतील एकूण ७५० विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

तपासणी दरम्यान अनेक विद्यार्थ्यांमध्ये व्हिटॅमिन –, व्हिटॅमिन ऊ ची कमतरता, तसेच पाश्चात्य आहारशैलीमुळे इतर जीवनसत्त्वांच्या कमतरतेची लक्षणे आढळून आली. त्याचप्रमाणे मोबाईल व टीव्हीचा अतिवापर झाल्यामुळे डोळ्यांचे आजार, डोळे लाल होणे, दृष्टी कमकुवत होणे अशा समस्याही निदर्शनास आल्या. या सर्व बाबींवर विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यात आले.

तसेच वैयक्तिक स्वच्छता व परिसर स्वच्छता याबाबत मार्गदर्शन करण्यात आली, पोषक आहाराबाबत व दिनचर्ये बाबत डॉक्टर सुषमा मेश्राम यांनी अतिशय सुंदर मार्गदर्शन केले,या उपक्रमात छखच- अमरावती शाखेचे अध्यक्ष डॉ प्रवीण औगड, सचिव डॉ.पंकज कावरे,वुमन्स फोरम अध्यक्षा डॉ. प्रेमा चौधरी यांचे मार्गदर्शनाखाली खालील डॉक्टरांनी सक्रिय सहभाग घेतला, याप्रसंगी , छखच- राष्ट्रीय सहसचिव डॉ. विजय अजमीरे, समन्वयक डॉ. कमल राऊत यांचा सन्मान करण्यात आला डॉ अनिल बाजारे,डॉ. प्रफुल वर्हाडे,डॉ.योजना बरडे, डॉ बोबडे मॅडम,डॉ. निलिमा उमप ,डॉ. प्रिया भट्टड,डॉ. अनुपमा काळे,डॉ. रसिका तायडे,डॉ. शिवम घुगे, डॉ. प्रतीक्षा राठोड, डॉ. योगेश पातशे,डॉ अंकुश वाकोडे,डॉ.मीनाक्षी व्यवहारे, डॉ. कल्याणी साहू, डॉ. सौरभ माकोडे, डॉ. तेजस आदि डॉक्टरांनी विद्यार्थ्यांची तपासणी केली, तपासणी दिनांक १ व २ ऑगस्ट रोजी दोन दिवस करण्यात आली,

या सर्व सेवाभावी डॉक्टरांच्या योगदानामुळे आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक व सर्व कर्मचारी वृंद यांचेवतीने सर्व डॉक्टरांचे मन:पूर्वक आभार मानून सन्मान करण्यात आला.

# कृषी निविष्ठा विक्रेत्यांवर गंडांतर – ई-पॉस नसल्यास थेट परवाना रद्द!

## कृषी सहसंचालकांचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**
अनुदानित खत विक्री करण्यासाठी कृषी विभागाकडून विक्रेत्यांना अत्याधुनिक ई पॉस मशीन १० ऑगस्टपूर्वी लावण्याचे आदेश दिले आहेत. जिल्ह्यात १० ऑगस्टपूर्वी ई पॉस न लावणाऱ्या कृषी केंद्रांचा परवाना रद्द करण्याची कारवाई करण्याचे आदेश विभागीय कृषी सहसंचालकांनी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकाऱ्यांना दिले आहेत. गतवर्षी याच कारणास्तव ६ केंद्रांवर परवाना निलंबनाची तर २ केंद्रांचा परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात आली.जिल्ह्यात किरकोळ रासायनिक खत विक्रे त्यांना अनुदानित रासायनिक खतांची करणे बंधनकारक आलेली आहे. तसे आदेश कृषी उपसंचालकांनी दिले आहेत. त्या आदेशानुसार जिल्ह्यातील केंद्रावर नवीन तंत्रज्ञानाने युक्त अशी ई पॉस मशीन बंधनकारक





आहे.जिल्ह्यात १२७८ रासायनिक खत विक्रेते आहेत. त्यांना अद्ययावत ई पॉस मशीन लावणेच नव्हे तर विक्रीची नोंद आयएफएम एस या प्रणालीमध्ये घेणेसुध्दा बंधनकारक आहे. ज्या खत विक्रेत्याकडे ई पॉसवरील खतसाठा व प्रत्यक्ष साठा यामध्ये फरक आढळेल, अशा खत विक्रेत्यांवर कारवाई करण्यात येईल. त्यामुळे १० ऑगस्टपूर्वी सर्व खत विक्रेता केंद्रावर ई पॉस लावण्यात यावे अन्यथा कारवाई करावी, असे आदेशात नमूद आहे.

### ९३० केंद्रावर अद्ययावत मशीन

जिल्हयात १२७८ कृषी निविष्ठा केंद्र आहेत. त्यापैकी ९३० कृषी निविष्ठा केंद्रावर अद्ययावत ई पॉस मशीन लावण्यात आलेली आहे. अन्य केंद्रावर लावण्याचे आदेश देण्यात आले. त्यातील काही केंद्र बंद आहे का हे ही पाहणे गरजेचे आहे. काहींचे परवाने रद्द केले असतील तरी ते यादीमध्ये आहेत.
– मल्लप्पा तोडकर, कृषी अधिकारी जि.प.अमरावती.

# अनधिकृत बांधकामांवर अमरावती महानगरपालिकेची कारवाई

## नागरिकांनी परवानगीशिवाय कोणतेही बांधकाम करू नये




**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

अमरावती महानगरपालिका क्षेत्रात अलीकडच्या काळात काही ठिकाणी विनापरवानगी बांधकामे सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. ही बांधकामे अनधिकृत असून, शहराच्या नियोजनबद्ध विकासावर याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. शहराच्या शिस्तबद्ध आणि संतुलित वाढीसाठी ही एक गंभीर समस्या बनत चालली आहे.

महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत कोणत्याही प्रकारच्या विकासकामासाठी, विशेषतः खाजगी जमीनमालक किंवा भुखंडधारकांनी महानगरपालिकेची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. परंतु, काही व्यक्ती अथवा संस्था ही परवानगी न घेता थेट बांधकामास प्रारंभ करीत आहेत, जे कायद्याच्या पूर्णतः विरोधात आहे.

महानगरपालिकेने अशा अनधिकृत बांधकामांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (चठढझ-लीं) च्या कलम ५३ व ५४ अन्वये थेट कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. या कलमानुसार अनधिकृत बांधकाम पाडण्यात येणे, दंड आकारणे तसेच संबंधितांवर कायदेशीर कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

महानगरपालिकेने नागरिकांना आवाहन केले आहे की, कुठलेही विकास काम किंवा नवीन बांधकाम करण्यापूर्वी महानगरपालिकेची रीतसर परवानगी घेणे आवश्यक आहे. परवानगीशिवाय कोणतेही बांधकाम केल्यास ते अनधिकृत समजून त्यावर कडक कारवाई करण्यात येईल.यासोबतच, नागरिकांनी कोणत्याही बांधकाम प्रकल्पात गुंतवणूक करताना महानगरपालिकेची मंजूरी आहे की नाही याची खातरजमा करणे आवश्यक आहे. अन्यथा अशा अनधिकृत प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करून आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

**अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात येईल**


महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे की, परवानगीशिवाय बांधकाम आढळल्यास, ते कोणतेही असो – निवासी, व्यावसायिक किंवा औद्योगिक – नियमानुसार त्यावर कारवाई करण्यात येईल आणि आवश्यक असल्यास ते निष्कासित करण्याची प्रक्रिया राबवण्यात येईल. त्यामुळे नागरिकांनी नियमानुसारच कामे पार पाडावीत व कायदेशीर प्रक्रिया पाळावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राजकमल, बेनाम चौकातील ऑनलाईन लॉटरी सेंटरवर धाड

## २.५५ लाखांचा मुद्देमाल जप्त, शहर गुन्हे शाखेची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

ऑनलाईन सेंटरमध्ये ऑनलाईन जुगार खेळ चालविणाऱ्या राजकमल चौक व बेनाम चौकातील सेंटरवर शहर गुन्हे शाखेच्या पथकाने धाड घातली. या दोन्ही ठिकाणाहून ११ जणांना ताब्यात घेत त्यांच्याकडून २ लाख ५५ हजार ७७० रूपये किमतीचा मुद्देम ाल जप्त करण्यात आला.




स्थानिक राजकमल चौकातील सितारामबाबा मार्केटमध्ये जय लॉटरी सेंटर आहे. या सेंटरमध्ये ऑनलाईन चक्री जुगार सुरू होता. याबाबतची माहिती मिळताच गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वातील पथकाने राजकमल चौकातील ऑनलाईन लॉटरी सेंटरवर धाड घातली. यावेळी येथे चक्रीजुगार खेळ सुरू असल्याचे दिसून आले. याते दोन जण पैशाची देवाण-घेवाण करून जुगार खेळ चालविताना दिसले. त्यानुसार धनराज गुरूमुखदास रामरख्यानी (वय ५५, रा. मनिपूर लेआऊट, विमवि), रूपेश म दनलाल आलेकर (वय ५०, रा. अंबागेट), ज्ञानेश्वर भानुदास बेलोकर (वय ५०, वनारसी), सुनील गोपीचंद पंजवानी (वय ५९, रा. दस्तुरनगर), सतीश शांताराम सावले (वय ६०, रा. अंबापेठ), दिनेश खुपचंदलालवाणी (वय ४०, रा. कंवरनगर), प्रकाश सेवकराम पिंजानी (वय ५६, रा. रामपुरी कॅम्प) व अनिकेत मधुकर साखरे (वय २८, रा. हरिदास पेठ, बडनेरा) या आठ जणांना पोलिसानी ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून रोख ३३ हजार ३६० रूपये व जुगार साहित्य असा एकूण १ लाख ५२ हजार ९६० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यासह बडनेरा मार्गावरील बेनाम चौकात भारसाकळे कॉम्प्लेक्समधील केसरी पान सेंटरमध्ये सुरू असलेल्या ऑनलाईन लॉटरी सेंटरवर गुन्हे शाखेच्या पथकाने धाड घातली. यावेळी फन टार्गेट या ऑनलाईन वेब साईटवर चक्री जुगाराचा खेळ सुरू असल्याचे दिसून आले. येथून राहुल मारोतराव बागडे (वय ३४, रा. साईनगर),तौफेल खान सलावत खान (रा. नमुना गल्ली नं. ३), महेश राजू खोडे (वय २७, रा. साईनगर) या तिघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून रोख ७ हजार ८१० रूपये व जुगार साहित्य असा एकूण १ लाख २ हजार ८१० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या दोन्ही कारवाईमध्ये गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, सहायक पोलीस निरीक्षक अमोल कडू, महेश इंगोले, उपनिरीक्षक संजय वानखडे, महेंद्र येवतीकर, दीपक सुंदरकर, गजानन ढेवले, आस्तिक देशमुख, मनोज ठोसर, जहिरोद्दीन, संग्राम भोजने, मंगेश शिंदे, अतुल संभे, नईम बेग, विशाल वाकपांजर, राहुल ढेंगेकर, योगेश पवार, राजीक रायलीवाले, सागर ठाकरे, चेतन कराळे, निलेश वंजारी, संदीप खंडारे, राहुल दुधे, चेतन शर्मा या पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

# कुख्यात मोटरसायकल चोरटा आणि घरफोड्या गुन्हेगार मोर्शी पोलिसांच्या जाळ्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७मोर्शी**

मोर्शी पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने नुकत्याच एका कारवाईत एक कुख्यात मोटरसायकल चोर व घरफोडी करणारा गुन्हेगार जेरबंद केला आहे. सदर आरोपी हा मध्यप्रदेशातील असून त्याच्यावर यापूर्वीही गंभीर गुन्हे दाखल आहेत.




पोलीस निरीक्षक श्री. राहुल आठवले यांनी त्यांच्या हद्दीत होणाऱ्या मालमत्तेसंबंधी गुन्ह्यांचा तपास करण्याचे आदेश गुन्हे प्रकटीकरण पथकाला दिले होते. त्यानुसार, पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे मोर्शी-शिंभोरा रोडवर, खुले कारागृहाजवळ संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या एका इसमावर नजर ठेवली. पोलिसांना पाहताच तो इसम पळून गेला, परंतु पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले.

तपासात आरोपीचे नाव जोगेंदरसिंह राजूसिंह भादा (वय २६, रा. शास्त्री वार्ड क्र. २८, पांढुर्णा, जि. पांढुर्णा, म.प्र.) असे असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्याकडून एक लोखंडी धारदार कोयता तसेच एक नेव्ही ब्लू रंगाची होंडा युनिकॉर्न मोटरसायकल (क्र. MH27-DX-0292, किंमत अंदाजे ९०,०००/-) जप्त करण्यात आली.

सदर मोटरसायकल बाबत तपास केला असता, ती एप्रिल २०२५ मध्ये पोलीस स्टेशन आष्टी, जि. वर्धा येथून चोरी गेल्याचे निष्पन्न झाले. शिवाय, आरोपीवर पो.स्टे. शेंदुरजना घाट (अमरावती ग्रामीण) येथे घरफोडीचा गुन्हा दाखल असून तो त्या प्रकरणात फरार होता.या कारवाईमुळे आष्टी पोलीस स्टेशन हद्दीतील गुन्हा (गु.क्र. ११६/२०२५, कलम ३७९ भादंवि) उघडकीस आला असून चोरी गेलेली मोटरसायकल पुनः प्राप्त करण्यात मोर्शी पोलिसांना यश आले आहे.सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. राहुल आठवले (ठाणेदार, मोर्शी) यांच्या नेतृत्वात पोउपनि आकाश शिवणकर, छत्रपती करपते, स्वप्नील बायस्कर यांनी केली असून, पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहेत.

# विदर्भ राज्य आंदोलन समितीचे ९ ला क्रांती दिवस आंदोलन




**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

विदर्भ राज्य आंदोलन समिती अमरावती शहर व जिल्हा शाखेच्या बतीने दिनांक ५ ऑगस्ट रोजी विविध ठिकाणी शेतकरी प्रश्न, श्रद्धांजली सभेसह संघटनात्मक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुढील आंदोलनाची रूपरेषा आखण्यात आली. त्यानुसार ९ ऑगस्ट क्रांती दिवसाला नागपूर येथे आंदोलन करण्याचे निश्चित करण्यात आले.

शशिशंकर वास्तु येथे झालेल्या संयुक्त बैठकीत महिला आघाडी विदर्भ राज्य आंदोलन समिती जिल्हा. अमरावतीश्रीमती यांच्या विविध विदर्भ प्रदेशाध्यक्षा रंजनाताई मामर्डे अध्यक्षतेखाली संघटनात्मक विषयांवर चर्चा झाली. बैठकीला पश्चिम विदर्भअध्यक्ष प्राचार्य डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत, जिल्हाध्यक्ष राजेंद्र आगरकर, महिला आघाडी अध्यक्ष सुषमा मुळे, शहराध्यक्ष रियाझ खान, जय विदर्भ पार्टीचे डॉ. विजय कुबडे, सरलाताई सपकाळ, प्रकाश लड्ढा, डॉ. पद्माताई राजपूत, माधवराव गावंडे, सुनील साबळे, सतीश प्रेमलवार, प्रा. शरद पुसदकर आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.नागपूर येथे ९ ऑगस्ट क्रांती ला विदर्भ संकल्प मेळावा, १४ दिवस आंदोलन, गोंदिया येथे १७सप्टेंबरला चिखलदरा येथे मेळघाट जनसंवाद मेळावा, २१ सप्टेंबरला कारंजा लाड विदर्भ जनजागृती मेळावा, २८ सप्टेंबरला नागपूर करार होळी, ८ ते १५ डिसेंबरला नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात लाँग मार्च, तसेच प्रि-पेड मीटर संदर्भातील जनहित याचिका बाबत चर्चा झाली व प्रकाश लढढा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली.

# सुदर्शननगर येथील वाल्मिकी सभागृह आणि स्वच्छता कामांची आयुक्ताकडून पाहणी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

महानगरपालिकाआयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी फ्रेजरपुरा नगरपालिका सुदर्शननगर येथील बाल्मिकी सभागृहाच्या बांधकामाची पाहणी केली. तसेच जुनाबायपास आणि ऑक्सिजन पार्क परिसरातील स्वच्छतेचीही पाहणी केली.

याठिकाणी स्वच्छतेच्या अनुषंगाने सुरु असलेल्या कामाचा आढावा घेत त्यांनी परिसर स्वच्छ व स्वच्छतामय ठेवण्यावर भर देण्याचे निर्देश दिले. तसेच नियमित साफसफाई, कचरा व्यवस्थापन, व स्वच्छ भारत अभियानाचे काटेकोर पालन होणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

वाल्मिकी सभागृहाच्या बांधकामास गती द्यावी, तसेच कामामध्ये गुणवत्ता आणि टिकाऊपणा यास प्राधान्य द्यावे. काम नियोजित वेळेत पूर्ण करून नागरिकांच्या वापरासाठी लवकरात लवकर उपलब्ध करून द्यावे, जुनाबायपास व ऑक्सिजन पार्क परिसरात दररोज नियमित स्वच्छता करणे अनिवार्य करावे, कचरा संकलन व विलगीकरण योग्य पद्धतीने करण्यात यावे, नागरिकांच्या आरोग्यासाठी आवश्यक ती औषध फवारणी वेळोवेळी करण्यात यावी, नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती वाढवण्यासाठी विशेष उपक्रम राबवावेत, असे निर्देश महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांनी दिले. या दौऱ्यात शहर अभियंता रवींद्र पवार, वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय जाधव, सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे, नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक कुंदन हडाले, प्रभागातील स्वच्छता निरीक्षक आणि स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# अमरावती जिल्हा परिषदेची निवडणूक ५९ जागांसाठीच होणार : १८ ऑगस्टला अंतिम प्रभाग रचना जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

ओबीसी आरक्षणाबाबतचा निकाल देताना जिल्हा परिषदेची निवडणूक नव्या रचनेनुसार होईल, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते. परंतु न्यायालयाच्या निवाड्यातील नवी रचना ही नोव्हेंबर २०२१ च्या पूर्वीची असल्याचा दावा स्थानिक निवडणूक विभागाने केला असल्याने अमरावती जिल्ह्यात ६६ नव्हे तर ५९ जागांसाठीच निवडणूक होईल, हे आता स्पष्ट झाले आहे.




२०१७ च्या सार्वत्रिक निवडणुकीवेळी अमरावती जिल्हा परिषदेत ५९ मतदारसंघ होते. त्या निवडणुकीचा पाच वर्षाचा कालखंड संपुष्टात येत असतानाच २०२२ च्या नव्या निवडणुकीचे वारे वाहू लागले. त्यावेळी तत्कालीन सरकारने वाढीव लोकसंख्येचा निकष लावत महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मतदारसंघ वाढविण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार १० मे २०२२ रोजी अमरावतीत ७ मतदारसंघ वाढून ५९ ची संख्या ६६ वर पोहोचली. त्यामुळे आगामी निवडणुका ५९ मतदारसंघांसाठी होतील की ६६ मतदारसंघांसाठी याबाबत संभ्रम निर्माण झाला होता. परंतु आगामी निवडणूक ही ५९ मतदारसंघांसाठीच होणार असून त्यात नामाप्रचे २७ टक्के आरक्षण असेल, असे जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक विभागाने स्पष्ट केले आहे.

**१८ ऑगस्टला अंतिम रचनेची घोषणा**

दरम्यान गेल्या पंधरवड्यात जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जाहीर केलेल्या जिल्हा परिषदेच्या प्रभाग रचनेवरील हरकती व सूचनांची सुनावणी आज, बुधवार, ६ ऑगस्ट रोजी पूर्ण झाली. विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांच्या न्यायालयात ही सुनावणी सुरु होती. सुनावणी पूर्ण झाल्यामुळे त्या आपला अंतिम अहवाल आगामी ११ ऑगस्टपर्यंत जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी या नात्याने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्याकडे पाठविणार आहेत. त्यानंतर जिल्हाधिकारी १८ ऑगस्टपर्यंत अंतिम प्रभाग रचना घोषित करतील.

# नूतन विदर्भ शिक्षण मंडळ सचिवपदी हितेश व्यास यांची केली नियुक्ती

## पुष्करणा फाउंडेशन, पुष्करणा ब्राह्मण समाजाच्या वतीने सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

नूतन विदर्भ शिक्षण मंडळाद्वारे चालवल्या जाणाऱ्या महिला महाविद्यालय, नूतन कन्या हायस्कूल, न्यू हायस्कूल बेलपुरा, न्यू हायस्कूल मेन या संस्थेच्या विद्यार्थी अनेक संस्थांमध्ये उच्च पदांवर आहेत. त्या दुव्याला अर्थपूर्ण बनवत हितेश व्यास यांनीही त्याच शैक्षणिक संस्थेतून शिक्षण घेतले आणि त्याच संस्थेचे सचिव झाले.



पुष्करणा समाजासाठी ही अभिमानाची बाब आहे आणि यासाठी पुष्करणा फाउंडेशन अमरावतीच्या कार्यकारिणीचे हितेश व्यास यांच्या घरी जाऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी मुकेश छांगानी यांनी एक कविता वाचून त्यांचे अभिनंदन केले.

नरोत्तम व्यास यांनी समाजाच्या एकतेचे आणि गेल्या काही वर्षांत केलेल्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.या वेळी पुष्करणा फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रमोद पुरोहित, उपाध्यक्ष शशिकुमार व्यास, पवन छंगाणी, प्रचार प्रमुख अनिल पुरोहित, ललित छंगाणी, कार्यकारिणी चे प्रा डॉ महेंद्र छंगाणी, अजय पुरोहित, नरोत्तम व्यास, चंपादेवी व्यास, मुकेश छंगाणी, सोनू आचार्य, गिरिराज पुरोहित, भरत बोहरा, आशीष व्यास, राजेश व्यास, मनीष बोहरा, कल्पेश छंगाणी, चिन्मय पुरोहित, अखिलेश व्यास यांनी अभिनंदन केले. उज्वल भविष्यासाठी आणि सक्षम नेतृत्वासाठी शुभेच्छा दिल्या.

# नवीन बायपासवर दरोड्याच्या तयारीत असलेल्या टोळीवर छापा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

नवीन बायपास रोडवर दरोड्याच्या तयारीत असलेल्या टोळीवर गुन्हे शाखा युनिट-२ ने कारवाई करत ७ आरोपींना ताब्यात घेतले. या टोळीकडून दोन जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या आदेशानुसार पो.नि. संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. ६ ऑगस्ट रोजी रात्री पेट्रोलिंगदरम्यान गुप्त माहितीच्या आधारे छापा टाकण्यात आला. येथे ७ इसम वाहनांना थांबवून दरोडा टाकण्याच्या तयारीत उभे असल्याचे आढळले. यामध्ये ५ जण ताब्यात आले, तर २ अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. ताब्यात घेतलेल्यांमध्ये राहुल गौतम श्रीरामे (मोरक्या), शेख सुफियान इलियास, यश उर्फ चारू मेश्राम यांचा समावेश आहे. दोन अल्पवयीन आरोपीही ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून बेसबॉल स्टिक, चायना चाकू, स्प्रे, दोरी, लोखंडी टॉमीसह एकूण ६६,०१५ चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी या टोळीची चौकशी केली असता त्यांनी राजापेठ व गाडगेनगर पोलीस ठाण्यांत केलेल्या जबरी चोरीच्या गुन्ह्यांची कबुली दिली. संबंधित पोलीस ठाण्यांतील गुन्ह्यांची पडताळणी करून ते उघडकीस आणण्यात आले. या प्रकरणी फेजरपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भीषण अपघात! गडचिरोलीत पहाटे फिरायला गेलेल्या मुलांना ट्रकने चिरडले, चार ठार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ गडचिरोली**

शहरापासून सात किलोमीटर अंतरावरील काटली गावाजवळ पहाटे फिरायला गेलेल्या ६ शालेय मुलांना अज्ञात ट्रकने धडक दिली. या भीषण अपघातात चार मुलांचा मृत्यू झाला. तर तिघे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहे. टिंकू नामदेव भोयर (१४), तन्मय बालाजी मानकर (१६), दुषण दुर्योधन मेश्राम (१४), तुषार राजेंद्र मारभते(१४) सर्व राहणार काटली अशी मृतांची नावे आहे. धडक दिल्यानंतर अंधाराचा फायदा घेत ट्रक चालक पसार झाला.



प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार सहाही मुले नेहमीप्रमाणे पहाटे फिरायला गेले होते. गडचिरोली-आरमोरी मार्गांवरील काटली गावापासून एक किमी अंतरावर असलेल्या नाल्याजवळील मार्गावर ही मुले बसली होती. दरम्यान ५ वाजून १० मिनिटाच्या सुमारास एका भरधाव अवजड वाहनाने सहाही मुलांना उडविले. यात टिंकू आणि तन्मय या दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर उपचारादरम्यान दुषणची प्राणज्योत मालवली. अपघातात जखमी क्षितिज तुळशीदास मेश्राम, आदित्य धनंजय कोहपरे या दोघांवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहे.दोघांची प्रकृती नाजूक असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. अपघातानंतर घटनास्थळावर काही काळ तणावाचे वातावरण होते. दरम्यान, भरधाव अवजड वाहतुकीवर गावकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. याप्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल करून प्राथमिक तपास सुरु केला आहे. प्रकाश कमी असल्याने आसपासच्या लोकांना ट्रक क्रमांक नोंदविता आला नाही. अपघाताची माहिती मिळताच गडचिरोलीचे पोलीस निरीक्षक विनोद चव्हाण यांनी घटनास्थळी जात प्रत्यक्षदर्शींचे बयान देखील घेतले आहे. त्यामुळे लवकरच धडक देणाऱ्या वाहनाची ओळख पटविण्यात येईल, असे पोलिसांचे म्हणणे आहे.

**मृतकांना श्रद्धांजली**

अपघातात मृत्युमुखी पडलेल्या चार मुलांना मंत्री दादाजी भुसे यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषदेचे सभागृहात दोन मिनिटाचे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मृतांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्र्यांकडून चार लाख रुपये मदत घोषित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शिक्षण विभागाने अपघात सानुग्रह अनुदान योजनेचा नियमाप्रमाणे देय लाभ मृतांच्या परिवाराला तात्काळ मिळवून देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

# रक्षाबंधनाच्या निमित्ताने यशोमती ठाकूर यांचं भावनिक भावबंध

## तब्बल दीड लाख राख्या पाठवून अनोखा उपक्रम : १७ वर्षांपासून अविरत सेवा सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती**

रक्षाबंधन हा सण केवळ भावाबहिणीच्या नात्याचा नसून प्रेम, विश्वास आणि जिव्हाळ्याचं प्रतीक आहे. हे नातं केवळ रक्ताचं नसलं तरीही भावनांनी बांधलेलं असतं. हेच नातं माजी मंत्री आणि काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी आपल्या मतदारसंघातील जनतेशी जपलं आहे. तब्बल १७ वर्षांपासून त्या तिवसा मतदारसंघातील ३३८ गावांमध्ये दरवर्षी दीड ते दोन लाख राख्या पाठवण्याचा उपक्रम अविरतपणे राबवत आहेत.



या वर्षीही त्यांनी दीड लाख राख्या खास आपल्या मतदारसंघातील 'भावां'साठी पाठवल्या आहेत. विशेष म्हणजे या सर्व राख्या स्वतःच्या हाताने लिफाफ्यात भरून, वेळेवर पोहोचाव्यात याची काळजी त्यांनी घेतली आहे. त्यांच्या या उपक्रमाला स्थानिक पातळीवरच नव्हे तर राज्यभरातून कौतुकाची थाप मिळत आहे.

माझं मतदारसंघातील लोकांसोबत केवळ राजकीय नव्हे तर कौटुंबिक नातं आहे. मी आमदार आहे की नाही, याचा फरक पडत नाही. माझ्या राख्या प्रत्येक घरात पोहोचतात. हे माझं भावंडांसोबतचं नातं आहे, जे कुठल्याही पदावर अवलंबून नाही, असं भावनिक वक्तव्य यशोमती ठाकूर यांनी दिलं.त्यांनी पुढे सांगितलं की, या उपक्रमाला यंदा १७ वर्षं पूर्ण होत आहेत. १५ वर्षांनंतर मी आमदार नसले तरी माझ्या राख्या वेळेवर पोहोचतात, याचा मला अभिमान वाटतो.रक्षाबंधनाच्या शुभेच्छा देताना त्यांनी सर्व मतदार बंधू-भगिनींना प्रेमपूर्वक संदेश दिला आहे. हे नातं कायम असावं आणि आपल्या जीवनात प्रेम, एकता आणि बंधुभाव असाच वृद्धिंगत होतो राहो, अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली.यशोमती ठाकूर यांची राखीवाली ताई अशी ओळख आता जनमानसात निर्माण झाली आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे राजकारणाच्या पलीकडचं एक नातं दिसून येतं - जे भावना, आपुलकी आणि सेवाभावाने जोडलेलं आहे.

# आमदार रोहित पवार यांचा उद्या अमरावती दौरा; यूपीएससी, एमपीएससी विद्यार्थ्यांशी साधणार थेट संवाद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) चे आमदार रोहित पवार शुक्रवार, दिनांक ८ ऑगस्ट २०२५ रोजी अमरावती दौऱ्यावर येत आहेत. यावेळी ते सकाळी १२ ते दुपारी ४.४५ वाजेपर्यंत संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, अमरावती येथे उपस्थित राहून यूपीएससी आणि एमपीएससी च्या विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधणार आहेत.

विद्यार्थ्यांच्या करिअरविषयक अडचणी, मार्गदर्शनाची गरज तसेच प्रशासनात सहभागी होण्याची त्यांची तयारी यावर सखोल चर्चा होणार आहे. हे व्यासपीठ विद्यार्थ्यांना त्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी व थेट आमदारांसमोर आपले मत मांडण्यासाठी एक सुवर्णसंधी ठरणार आहे.यावेळी सर्व विद्यार्थी, युवक, व अभ्यासकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# खडकारीपुरा येथे गॅस रिफिलिंग करणाऱ्या दोघांना अटक

## ५० सिलेंडर जप्त, खोलापुरी गेट पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

शहरातील खडकारीपुरा परिसरात अवैधरित्या गॅस रिफिलिंग करणाऱ्यांविरोधात खोलापुरी गेट पोलिसांनी मोठी कारवाई करत दोघांना अटक केली आहे. त्यांच्याकडून एकूण ५० गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले असून, या कारवाईने परिसरात खळबळ उडाली आहे. ही कारवाई आज, ७ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास करण्यात आली. राहुल दिलीप गडलिंग (वय ३५) व रुपेश पंडूजी ढोके (वय ३७, दोघेही रा. खडकारीपुरा) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. राहुल गडलिंग यांच्या



घरीच ही गॅस रिफिलिंगची अवैध प्रक्रिया सुरू होती. पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकून ३९ घरगुती व ११ व्यावसायिक वापराचे अशा एकूण ५० गॅस सिलेंडर, एक ऑटो, एक वजन काटा आणि तीन रिफिलिंग मशीन जप्त केली आहेत. गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. अवैध गॅस रिफिलिंगमुळे परिसरात मोठा अपघात घडण्याची शक्यता असते. त्यामुळे ही कारवाई अत्यंत महत्वाची ठरली आहे. पुढील तपास खोलापुरी गेट पोलीस करत आहेत.

# अमरावतीत ३१% पावसाची तूट, कोरड्या दुष्काळाचे सावट

## पिकांची वाढ खुंटली, अर्ध्यापेक्षा जास्त पावसाचा संपला, ३१ टक्के तूट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

जिल्ह्यात सरासरीच्या तुलनेत सर्वात कमी ५६ टक्के नांदगाव खंडेश्वर, ५६.६ टक्के भातकुली व ५७.५ टक्के पाऊस धारणी तालुक्यात झालेला आहे. याशिवाय १९ मंडळात सरासरीच्या ५० ते ६० टक्क्यांच्या आत पाऊस झालेला आहे. जिल्ह्यात ३१ टक्के पावसाची तूट आहे. जमिनीत आर्द्रता नसल्याने पिकांची वाढ खुंटली. अर्धापेक्षा जास्त पावसाळा संपल्याने या तालुक्यांसह १९ महसूल मंडळात कोरड्या दुष्काळाचे सावट आहे.



जिल्ह्यात ५ ऑगस्टपर्यंत ४७८.३ मिमी पावसाची सरासरी अपेक्षित असताना प्रत्यक्षात ३२९.९ मिमी पावसाची नोंद झालेली आहे. ही टक्केवारी ६९ आहे. यामध्ये फक्त तिवसा तालुक्यात सरासरीच्या १०६ टक्के पावसाची नोंद झाली. याशिवाय सर्वात कमी नांदगाव खंडेश्वर ५६.३ टक्के, धारणी ५७.५ टक्के, अचलपूर ६०.७टक्के व भातकुली तालुक्यात ५६.७टक्केच पाऊस झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

यु.पी., पंजाब आणि बिहारवर हवेच्या वरच्या थरात चक्राकार वारे आहेत. मान्सूनची ट्रफरेषा सध्या फिरोजपूर, चंडीगड, पाटणावरून बंगालच्या उपसागरात गेलेली आहे. त्यामुळे मध्य भारतात पाऊस कमी झालेला आहे आणि पावसाची उसंत आहे. ७ऑगस्टपासून पावसाचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.

चुरनी महसूल मंडळात सर्वात कमी ३९.५ टक्के तर वरखेड मंडळात सर्वाधिक १४९ टक्के पावसाची नोंद झाली. याशिवाय सरासरीच्या तुलनेत फक्त ५० ते ६० टक्के पाऊस धारणी, सावलीखेडा, साद्राबाडी, गौलखेडा बाजार, अमरावती, बडनेरा, वलगाव, भातकुली, आष्टी, आसरा, खोलापूर, नांदगाव, मंगरूळ, लोणी, धानोरा, माहुली, दारापूर, अचलपूर, परसापूर व परतवाडा मंडळात झाला. पावसाअभावी जमिनीत पुनर्भरण झालेले नाही. त्यामुळे जमिनीत आर्द्रतेचे प्रमाण कमी आहे. शिवाय भूजलस्तरदेखील वाढलेला नाही. नदी-नाल्यांनादेखील फारसे पाणी नाही.

**आतापर्यंत झालेला तालुकानिहाय पाऊस**

अमरावती तालुक्यात ६४ टक्के, चांदूरबाजार ७९.६ टक्के, मोर्शी ८९.९ टक्के, वरुड ८८.४ टक्के, दर्यापूर ८१ टक्के, अंजनगाव ८६.५, चांदूरबाजार ७९.६ टक्के व धामणगाव तालुक्यात ७८.२ टक्के पावसाची नोंद झाली आहे. आठ दिवस रिमझिम पावसाने पिकांना उभारी मिळाली असली, तरी पावसाची तूट कायम असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

# रस्त्याच्या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीचे महादेवखोरी येथे आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

महादेवखोरी परिसरातील भोवते ले-आउट ते महादेवखोरी पुलापर्यंतच्या खराब रस्त्यामुळे त्रस्त नागरिकांच्या वतीने वंचित बहुजन आघाडीने आज, ७ ऑगस्ट रोजी दुपारी तीव्र आंदोलन केले.या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून यामुळे यशोदानगर ते महादेवखोरी या मुख्य मार्गावरून दररोज प्रवास करणाऱ्या हजारो नागरिक, शालेय विद्यार्थी, वयोवृद्ध यांना गंभीर अडचणींचा सामना करावा




लागत आहे. खड्ड्यांमुळे अपघातांची शक्यता वाढली असून अनेकांना मणक्याचे व कमरेचे त्रास सुरू झाले आहेत.या संदर्भात यापूर्वी प्रशासनाकडे निवेदन देऊन खड्ड्यांमध्ये कागदी नाव सोडून लक्ष वेधण्यात आले होते. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने वंचितने आक्रमक पवित्रा घेतला आहे.महानगरपालिका आहे तरी कुणासाठी? असा सवाल उपस्थित करून वंचित बहुजन आघाडीने मनपावर सडकून टीका केली. मनपा इमारतीच्या नूतनीकरणासाठी निधी असताना खड्डे बुजवण्यासाठी पैसा नसल्याची टीका करत, सक्तीची कर वसुली सुरू असताना नागरिकांना मूलभूत सुविधा न मिळणे दुर्दैवी असल्याचे सांगितले.खड्डे न भरल्यास पुढील आंदोलन थेट मनपा आयुक्तांच्या दालनात केले जाईल, असा इशारा वंचितच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. तोपर्यंत आंदोलन सुरूच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून कारागृहाची पाहणी कारागृह अभिविक्षक मंडळाची बैठक संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली कारागृह अभिविक्षक मंडळाची त्रैमासिक सभा पार पडली. यावेळी जिल्हाधिकारी यांनी कारागृहाचे आतील परिसर व बरॅकची पाहणी केली. तसेच सुरक्षा व्यवस्था बळकट करण्याच्या सूचना केल्या. सदर सभेसाठी जिल्हा शल्य चिकित्सक दिलीप सौंदळे, कार्यकारी अभियंता श्री. गिरी, तसेच कारागृहाच्या अधीक्षक किर्ती चिंतामणी, उपअधीक्षक प्रदिप इंगळे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, अंतर्गत सुरक्षा अधिकारी, मंडल तुरुंगाधिकारी आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी यांनी कारागृहातील पाकगृह, कारखाना, मुर्तीकाम, शिवणकाम, सुतारकाम, लॉन्ड्री, पॅथोलॉजी, ई-सेल, मुलाखत कक्ष, धान्य गोदाम, उपहारगृह, ग्रंथालय, रेडिओ कक्ष, ई-लायब्ररी, मुक्त विद्यापीठाचे कारागृहातील अभ्यास केंद्र, व्हिडिओ कॉन्फरन्सींग कक्ष, दवाखाना, महिला विभाग, अति सुरक्षा विभागास भेट देऊन समस्या जाणून घेतल्या. तसेच जिल्हा नियोजनच्या निधी अंतर्गत सुरु असलेल्या बांधकामाचा आढावा घेतला. कारागृहाच्या सुरक्षा कारणास्तव कार्यालयास ई-बाईक, जनरेटर खरेदी, सोलर यंत्रणा, प्रस्ताव सादर केल्यास जिल्हा नियोजनमधून निधी देण्यात येईल असे सांगितले आहे. भेटी दरम्यान जिल्हाधिकारी यांनी कारागृहाचे पाकगृह आधुनिकीकरण आणि नवीन गॅस पाईप लाईनसाठी जिल्हा नियोजनच्या निधीमधून निधी देण्याचे येणार असल्याचे सांगितले. तसेच जनरेटर दुरुस्ती करण्याबाबत व सीसीटीव्ही यंत्रणा सुरक्षेच्या कारणास्तव जनरेटरशी जोडणी करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागास आदेश दिले. सांस्कृतिक हॉलसाठी प्रोजेक्टरसारख्या अत्याधुनिक सुविधेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले. यासोबतच पोलिस विभागास पुरेसा पोलिस पथक पुरविण्याबाबत आदेश दिले.

# कोणत्या पदार्थामध्ये किती साखर? राज्य मंडळाच्या शाळांमध्ये शुगर बोर्ड स्थापनेच्या सूचना; विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी पाऊल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ७ अमरावती**

साखरेच्या अतिसेवनामुळे वाढणारा मधुमेह रोखण्यासाठी राज्य मंडळाच्या सर्व शाळांमध्ये 'शुगर बोर्ड' स्थापन करण्याचे आदेश ३० जूनला राज्य मंडळाने दिले. त्यामुळे शाळांमध्ये आता विद्यार्थ्यांना कोणत्या पदार्थात किती कॅलरीज आणि किती साखरेचे प्रमाण आहे ते समजण्यास मदत होईल.

**मधुमेह, लठ्ठपणा...**

प्रक्रिया केलेले पदार्थ खाल्ल्याने मुलांमध्ये विविध आजार बळावतात. टाइप-२ प्रकारचा मधुमेह, लठ्ठपणा, दंतविकार व पचना संबंधीचे विकार वाढत आहेत. त्यामुळे सरकारने प्रत्येक शाळेमध्ये शुगर बोर्ड स्थापन करण्याची सूचना केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आहाराबाबत जागृती होण्यास मदत होईल.

**आरोग्यदायी पर्याय**

| हे टाळा | हे खावे |
|---|---|
| गोड पदार्थ | ओट्स, फळे, नट्स |
| सॉफ्ट ड्रिंक्स | लिंबूपाणी, नारळ पाणी, ताक |
| स्नॅक फूड | मखाणे, भाजलेले शेंगदाणे, |
| पॅकबंद ज्युस | घरगुती ताजे फळरस, फळे |
| गोड पदार्थ चॉकलेट्स | खजूर, मनुका, गोडवा |
| फ्लेवर्ड दूध | हळद टाकून घरगुती दूध |
| गोड दही | ताजे फळ |